लोकनेता

मा. रामशेठ ठाकूर काव्यमय जीवनगाथा

प्रातिनिधिक काव्यसंग्रह



गणेश कोळी
संपादन

कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्हा आणि नवीन पनवेल शाखा


• कविसंमेलन • सन्मान पुरस्क


लोकनेते, माजी खासदार मा.रामशेठ ठाकूर साहेब
यांच्या वाढदिवसानिमित्त
एक
कृतार्थ
संध्याकाल


कविसंमेल



लोकनेता

लोकनेता

मा.रामशेठ ठाकूर काव्यमय जीवनगाथा

प्रातिनिधिक काव्यसंग्रह

गणेश कोळी
संपादन

लोकनेता

मा.रामशेठ ठाकूर काव्यमय जीवनगाथा

प्रातिनिधिक काव्यसंग्रह

आशीर्वादाचे शब्द
पद्मश्री मधु मंगेश कर्णिक
संस्थापक अध्यक्ष, कोमसाप

संकल्पना/संपादन
गणेश कोळी

विशेष सहाय्य
अरूण म्हात्रे
सुप्रसिध्द साहित्यिक

मुखपृष्ठ
मनोज कोलगे

अक्षर जुळणी
दत्तात्रेय कोळी

प्रथमावृत्ती : २६ मे २०२६

प्रकाशक
प्रा. चंद्रकांत मढवी
ॲड. मनोज म्हात्रे
ई/६:०२, सेक्टर-१८,
नवीन पनवेल, जि.रायगड

मुद्रक
गौरव आर्टस्
डोंबिवली, जि.ठाणे

लेखकाचा पत्ता
गणेश कोळी
बी, २०२, यशोकृष्ण अपार्टमेंट
विरूपाक्ष मंदिराजवळ,
पनवेल, जि.रायगड
मो. ९३२२३३९७९७
ganeshkoli69@gmail.com

किंमत – १०० रूपये

हार्दिक अभिनंदन!



कोकण मराठी साहित्य परिषदेच्या सल्लागारपदी

मा. रामशेठ ठाकूर साहेब

यांची नियुक्ती झाल्याबद्दल

हार्दिक अभिनंदन....!

- श्री.संजय गुंजाळ
  अध्यक्ष
  कोमसाप, रायगड

- श्री.गणेश कोळी
  केंद्रीय जिल्हा प्रतिनिधी
  कोमसाप, रायगड

रायगड जिल्हा कोकण मराठी साहित्य परिषद
नवीन पनवेल शाखा कोकण मराठी साहित्य परिषद


आशीर्वादाचे शब्द....



मधु मंगेश कर्णिक
(पद्मश्री)

लोकनेते श्री. रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षपूर्तीच्या प्रसंगी आपण एक प्रातिनिधिक काव्यसंग्रह प्रकाशित करणार आहात, हे वाचून आनंद झाला. लोकनेते रामशेठ ठाकूर हे समाजसेवेमध्ये जेवढे स्वारस्य घेतात, तसेच काव्य शास्त्र विनोदही त्यांना प्रिय असतात, हे मला माहीत आहे. काव्याच्या माध्यमातून त्यांना अभिवादन करणे, हे या प्रसंगा सर्वस्वी यथोचित होईल. या काव्यसंग्रहाला मनःपूर्वक शुभेच्छा.

४०१-मार्व्हल, शास्त्रीनगर, अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०० ०५३. दूरध्वनी : ९१२०३२३६६७ / ०२२-०२३६६७
मु.पो. कसाळ, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग ४१६६०१. (व्हाया फोंडा घाट)



एक साहित्य प्रेमी लोकनेता....
साहित्यिक उपक्रमांचे आधारवड....
नवोदित साहित्यिकांना प्रोत्साहन देणारे मार्गदर्शक....
साहित्यप्रेम जपणारे दानशूर व्यक्तीमत्व....
समाजाभिमुख व्यक्तीमत्व....
मराठी दिवाळी अंक स्पर्धेतून साहित्यिक
परंपरा जपणारा लोकाभिमुख नेता....
साहित्य, संस्कृती आणि कवी मन यांचा जिव्हाळ्याने
सन्मान करणारे कोकण मराठी साहित्य परिषदेचे
सल्लागार आदरणीय रामशेठ ठाकूर साहेब यांना
'लोकनेता' हा प्रातिनिधिक काव्यसंग्रह
सस्नेह समर्पित करीत आहोत

अनुक्रमणिका

१ पुस्तकाविषयी दोन शब्द.....गणेश कोळी....९
२ प्रस्तावना.....आम्ही देखिला आरसा प्रांजळाचा.....अरूण म्हात्रे....११
३ लेख..रामशेठचा अमृतमहोत्सव 'लोकोत्सव' का होतो?.....मधुकर भावे....१४

कविता

१ असा सागरा सारखा आगरी.....अशोक नायगांवकर....२०
२ ह्या मातीचा थोर वारसा.....अरूण म्हात्रे....२१
३ लोकनेता..... न.ग.पाटील....२२
४ जनमनातील दीपस्तंभ.....डॉ. विनायक व्ही. लोहार....२३
५ उत्तुंग कर्तृत्वाचे धनी.....बाबू फिलीप डिसोजा कुमठेकर....२४
६ शब्दांची ओंजळ!.....ज्योत्स्ना राजपूत....२५
७ दानशूर लोकनेता.....अजय शिवकर....२६
८ जननायक.....नवनाथ एकनाथ ठाकूर.....२७
९ समाजकारणी.....चारूशीला रमेश म्हात्रे....२८
१० माणुसकीचा ध्यास.....स्नेहाराणी एस. गायकवाड....२९
११ देवदूत.....ऋता मनोज भामरे....३०
१२ रामबाग.....सोमनाथ र. घरत (स्वामी)....३१
१३ गरिबांचा दाता.....सचिन पाटील....३२
१४ पनवेलचा कोहिनूर.....उज्वला वामन दिघे....३३
१५ रायगडचा विकासदीप.....प्रा. स्नेहंकित मुनिश्वर सारंग....३४
१६ ठाकूर सर.....डॉ. अविनाश पाटील.....३५
१७ कार्यतत्पर.....मोहन भोईर....३६
१८ व्यक्तिमत्व नामवंत.....प्रणाली मंगेश म्हात्रे....३७
१९ किंगमेकर.....संदीप बोडके....३८
२० कार्यकुशल रामशेठ.....अरूण दत्तात्रेय म्हात्रे....३९
२१ भाग्यविधाते.....धनराज विसपुते....४०

२२ जनतेचा ध्रुवतारा.....डॉ. सीमा कांबळे....४१
२३ शेठ.....अंकुश नथुराम जाधव....४२
२४ आधार!.....सुरेशचंद्र म्हात्रे....४३
२५ रायगडचा जननायक.....बी.एन.पाटील....४४
२६ धन्य धन्य ही रामकथा.....प्रविण हाशिवरेकर....४५
२७ शिल्पकार.....प्रा. चंद्रकांत मढवी....४६
२८ साहित्यिकांनाही देई सन्मान.....रामदास गायधने....४७
२९ तारणहार.....प्रवीण नारायण दवणे....४८
३० कृतार्थ.....सुनिता रामचंद्र....४९
३३ रयतेतला राम.....जयेश शिंदे....५०
३१ देवमाणूस.....सुभाष कुडके....५१
३२ आमचे रामशेठ.....संतोष सुतार....५२
३३ काही माणसं अशीही असतात.....कामिनी खाने....५३
३४ यशाचे शिखर.....रोहिणी श्रीकांत कोठावदे....५४
३५ कर्तबगार व्यक्तीमत्व.....रामचंद्र उधऱ्या म्हात्रे....५५
३६ घातली गगनाला गवसणी.....चंद्रकांत नारायण पाटील....५६
३७ समाजप्रेमी.....संतोष जाधव....५७
३८ नेता.....संजना पगारे-लोखंडे....५८
३९ कर्मयोगी.....दमयंती मो. भोईर....५९
४० रामशेठ.....डॉ. प्रभाकर गावंड....६०
४१ अभिष्टचिंतन.....सीमा रिसबुड....६१
४२ साहेब.....रंजना संजय केणी....६२
४३ रामशेठ.....रोहिदास पोटे....६३
४४ कार्यसम्राट.....जनार्दन पाटील सोनखारकर....६४
४५ उत्तुंग भरारी.....संध्या विजय दिवकर....६५
४६ गोरगरीबांचे कैवारी.....एस.एस.पाटील....६६
४७ रामशेठ.....रंजना मढवी....६७
४८ रामशेठ ठाकूर.....लवेंद्र मोकल....६८
४९ रामामृत गीत.....राधिका शिर्के....६९

५० आपुलकीची सावली.....गणेश म्हात्रे....७०
५१ लोकनेते रामशेठ.....शुभांगी मयुर म्हात्रे....७१
५२ ज्ञान पंढरीचे रामशेठ वारकरी.....चित्ररेखा रवींद्रनाथ जाधव....७२
५३ जनकल्याणाचा ध्यास.....नियती पाटील....७३
५४ कर्तृत्व, दातृत्व.....राजश्री तुळसणकर....७४/७५
५५ नव्या समाजाचे शिल्पकार.....ॲड. मनोज म्हात्रे....७६
५६ ज्ञानाची मंदिरे.....स्मिता गांधी....७७
५७ कर्मयोगी.....योगिनी वैदू....७८
५८ समर्थ नेतृत्व.....सुवर्णा वैदू....७९
५९ विकासाचा दीप.....गणेश कोळी....८०
६० वाढदिवसाच्या दिव्यज्योती.....डॉ. शैलजा करोडे....८१
६१ लोकनेते रामशेठ ठाकूर.....अनिल दाभाडे....८२
६२ अमृत उत्सवाचा.....काशिनाथ मढवी....८३
६३ कुशल उद्योगपती.....दर्शन कोळी....८४
६४ पुराणपुरूष.....ऋतुजा म्हात्रे-महामुनी....८५
६५ माणुसकीचा झरा.....विजय दत्तात्रेय गायकर....८६
६६ कृतार्थ जीवन.....विजय इंदुकेशव पवार....८७
६७ साधी रहाणी.....ॲड. सुनिता श्रीकांत जोशी....८८
६८ पनवेलाची शान.....माधव अभ्यंकर....८९
६९ भरारी.....राजेंद्र नाईक....९०
७० शिक्षणप्रेमी लोकनेता.....दर्शना प्रफुल्ल माळी....९१
७१ तू संविधानाचा प्रदीप.....प्रा. डॉ. सुभाष वाघमारे....९२/९३
७२ समाजसेवक.....मिनल शंकर माळी....९४
७३ शिक्षण प्रसारक.....मनस्वी मिनल शंकर माळी....९५
७४ अभिष्टचिंतन कष्टकऱ्यांच्या रामाचे.....ॲड. प्रमोद तुकाराम म्हात्रे....९६
७५ लोकनेते रामशेठ यांच्याविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया....९७
७६ लोकनेते रामशेठ यांच्याविषयी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांची प्रतिक्रिया....९८
७७ कार्यक्रम-उपक्रमांचे छायाचित्र.....९९ ते १०५



गणेश कोळी

सुप्रसिध्द साहित्यिक

पुस्तकाविषयी

लोकनेते, माजी खासदार तथा साहित्यप्रेमी आणि कोकण मराठी साहित्य परिषदेचे सल्लागार आदरणीय रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी अर्थातच ७५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या अष्टपैलू व बहुआयामी कार्यकर्तृत्वाला शब्दरूपाने अभिवादन करण्यासाठी कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्हा व नवीन पनवेल शाखेच्यावतीने लोकनेता हा प्रातिनिधिक काव्यसंग्रह प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्षण, समाजकारण आणि विकास यांचा सुंदर संगम म्हणजे आदरणीय रामशेठ ठाकूर यांचे आयुष्य. लोकनेता हा केवळ काव्यसंग्रह नसून तो रामशेठ ठाकूर यांच्या सामाजिक, राजकीय आणि लोकाभिमुख कार्याचा काव्यमय गौरवग्रंथ असेल. त्यांच्या अमृतमहोत्सवी अर्थात ७५ व्या वाढदिवसानिमित्त सातारा, पुणे, पालघर, ठाणे, रायगड, नव्या मुंबईतील ७५ कवींनी आपल्या शब्दांतून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडण्याचा प्रयत्न या संग्रहात केला आहे.

लोकनेता या प्रातिनिधिक काव्यसंग्रहात महाराष्ट्रातील ख्यातनाम कवी अशोक नायगावकर आणि अरुण म्हात्रे यांच्या कवितांचा समावेश झाल्याने या काव्यसंग्रहाची साहित्यिक प्रतिष्ठा अधिक वृद्धिंगत झाली आहे. हा काव्यसंग्रह केवळ साहित्यिक अभिव्यक्ती नसून, आदरणीय रामशेठ ठाकूर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, कार्याचा आणि समाजावर झालेल्या प्रभावाचा काव्यमय दस्तऐवज ठरणार आहे.

रामशेठ हे केवळ एक नाव नाही, तर संघर्ष, कर्तृत्व, जनसंपर्क, माणुसकी आणि विकासदृष्टी यांचे प्रतीक आहे. त्यांच्या कार्याचा प्रवास म्हणजे समाज हितासाठी झटणाऱ्या एका लोकनेत्याची प्रेरणादायी काव्यमय जीवनगाथा होय. रामशेठ ठाकूर यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे कार्य आणि संवेदनशीलतेचा समतोल साधणारा एक प्रेरणास्रोत आहे. त्यांनी जपलेली माणुसकी, उभा केलेला विकासाचा आदर्श आणि कार्यकर्त्यांप्रती असलेला जिव्हाळा यामुळे ते केवळ लोकप्रतिनिधी न राहता लोकांच्या मनातील लोकनेता बनले. या पुस्तकाच्या माध्यमातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध रंग आणि कार्याची व्यापकता वाचकांसमोर प्रभावीपणे उलगडेल, असा विश्वास वाटतो.

समाज जीवनात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांच्या कार्याचा ठसा केवळ राजकारणापुरता मर्यादित राहत नाही, तर सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक क्षेत्रातही त्यांचे योगदान दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरते. लोकनेते माजी खासदार आदरणीय रामशेठ ठाकूर साहेब हे असेच एक बहुआयामी, अष्टपैलू आणि जनमानसात अढळ स्थान निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व आहे.

रायगड आणि नवी मुंबईच्या सामाजिक व राजकीय वाटचालीत रामशेठ ठाकूर साहेबांनी केलेले कार्य अतिशय मोलाचे आणि प्रेरणादायी आहे. जनसामान्यांच्या प्रश्नांशी नाळ जोडून, विकासाचा ध्यास घेऊन त्यांनी उभारलेले

कार्य आजही अनेकांसाठी प्रेरणेचा स्रोत आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या दैनिक रामप्रहर या वृत्तपत्रातून त्याचप्रमाणे राज्यस्तरीय मराठी दिवाळी अंक स्पर्धेतून अनेक साहित्यिकांना अनेक कवींना प्रोत्साहित केले आहे. साहित्यिक उपक्रमांना त्यांनी दिलेला भक्कम आधार आणि साहित्यप्रेमी म्हणून त्यांनी जपलेली भूमिका ही साहित्य विश्वासाठी अभिमानाची बाब आहे.

त्यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त कोकण मराठी साहित्य परिषद, रायगड जिल्हा व नवीन पनवेल शाखेच्यावतीने प्रकाशित होणारा लोकनेता हा प्रातिनिधिक काव्यसंग्रह म्हणजे त्यांच्या कार्यकर्तृत्वाला शब्दांमधून अर्पण केलेली भावांजली आहे. या काव्यसंग्रहातून विविध कवींनी आपल्या शब्दांची गुंफण करत रामशेठ ठाकूर यांच्या जीवन प्रवासातील विविध पैलूंना काव्यमय अभिव्यक्ती दिली आहे.

कोकणातील साहित्यिक आणि कवींना व्यासपीठ मिळावे म्हणून आदरणीय पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांनी कोकण मराठी साहित्य परिषदेची स्थापना केली. आज मुंबईपासून ते सिंधुदुर्गपर्यंत कोकण मराठी साहित्य परिषदेच्या अनेक शाखा साहित्यिक उपक्रमांच्या माध्यमातून काम करीत आहेत. कोकण मराठी साहित्य परिषदेच्या कार्यक्रम-उपक्रमांना कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांचे आम्हाला आशीर्वाद मिळत आहेत. कोकण मराठी साहित्य परिषदेच्या अध्यक्षा नमिताताई कीर, कार्याध्यक्ष प्रा.डॉ. प्रदीप ढवळ, कोकण मराठी साहित्य परिषदेचे विश्वस्त रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आज आम्ही काम करत आहोत. कोकण मराठी साहित्य परिषद, नवीन पनवेल शाखेच्यावतीने प्रकाशित होणारा लोकनेता हा दुसरा प्रातिनिधिक काव्यसंग्रह आहे. यापूर्वी प्रकाशित झालेल्या ओंजळीतील शब्दफुले या काव्यसंग्रहाचे ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांच्या शुभहस्ते प्रकाशन करण्यात आले होते. अनेक कवींना विविध कारणांमुळे स्वतःचा स्वतंत्र काव्यसंग्रह प्रकाशित करणे शक्य होत नाही; अशा साहित्यिकांना व्यासपीठ मिळावे या हेतूने प्रातिनिधिक काव्यसंग्रहाची संकल्पना राबविली जाते. आपल्या कविता पुस्तकात प्रकाशित झाल्याचा आनंद कवींच्या चेहऱ्यावर खुलताना पाहणे, हीच या उपक्रमाची खरी प्रेरणा आहे. आज त्याच परंपरेत लोकनेता या दुसऱ्या काव्यसंग्रहाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन होत आहे, ही आनंदाची बाब आहे.

हा प्रतिनिधिक काव्यसंग्रह प्रकाशित करण्यासाठी सुप्रसिद्ध साहित्यिक अरूण म्हात्रे, कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे संस्थापक अध्यक्ष रायगडभूषण प्रा.चंद्रकांत मढवी, ॲड.मनोज म्हात्रे, मित्रवर्य साहित्यिक विजय पवार, प्राचार्या सिमा कांबळे आणि कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्ह्याचे अध्यक्ष संजय गुंजाळ, कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे पदाधिकारी सदस्य व काव्यसंग्रहातील सर्व कवींचे सहकार्य लाभले.

डॉ. विनायक लोहार यांच्या कवितेत...
ज्ञानी, संयमी, सच्चे लोकनेते,
रायगडचे भाग्यविधाते महान ।
कर्तृत्वाच्या तेजस्वी आकाशी,
रामशेठ ठाकूर नाव चिरंतन ।।
अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

लोकनेता या प्रातिनिधिक काव्यसंग्रहातील शब्दांच्या या ओव्यातून उलगडणारी ही जीवनगाथा काळाच्या प्रवाहात प्रेरणेचा दीपस्तंभ ठरो आणि लोकनेता ७५ मधील प्रत्येक कविता वाचकांच्या हृदयात आदर, संवेदना व समाजसेवेची नवी चेतना जागवो, यामुळे हा प्रातिनिधिक काव्यसंग्रह फक्त कवितांचा नसून एका लोकनेत्याच्या जीवनसंघर्षाचा आणि कार्याचा काव्यमय प्रवास आहे.

प्रस्तावना

महासागराचा चरित्र मला माहित आहे
माहित आहे त्याची महतीही
पण मी राहतो आहे फुलाच्या पाकळीवर
अवकाशातून उतरलेल्या दहीवराच्या एका
लहानशा थेंबामध्ये, मला माहित आहे हे ही
ही जगातल्या साऱ्या थेंबांवर अंतिम मालकी
आहे महासागराची आणि तरीही माझी बांधिलकी
पृथ्वीला भिडणाऱ्या त्या सीमाहीन महातत्त्वाची
नाही ती आहे माझ्याच अस्तित्वाने
ओथंबलेल्या स्फटिकाच्या या थेंबाशी
कारण माझी बांधिलकी ज्ञानाशी नाही,
आहे फक्त प्रेमाशी..!

कविवर्य कुसुमाग्रजांची ही कविता आदरणीय रामशेठ ठाकूर सरांना इतकी तंतोतंत लागू पडते ही जणू तात्यांनीच या लोकनेत्यासाठी ह्या ओळी रचल्या की काय असे वाटावे. अर्थात ह्यातही एक गंमत आहे.

तात्या म्हणतात माझी बांधिलकी ज्ञानाशी नाही. मात्र रामशेठ ठाकूर तर आजन्म ज्ञानाशी बांधिलकी मानूनच नंतरच प्रेमाची बांधिलकी मानतात.. आणि हा एक सुंदर योगायोग वाटतो की ज्या पद्धतीने तात्या सर्व जगाचा आणि कवितेचा विचार करीत असत अगदी तसाच आमचे रामशेठ ठाकूर करत असताना दिसतात. फक्त ते तात्यांसारखे लिहीत नाही. मात्र अशा शब्दांवर त्यांचे नितांत प्रेम आहे. किंबहुना तीच त्यांची हृदयस्थ आवड आहे. कवितेचा त्यांना नाद आहे आणि साहित्य हा त्यांचा पहिला श्वास आहे. आज त्यांच्या ७५ च्या निमित्ताने ७५ कवींनी त्यांच्यावर जी शब्दरूपी फुले उधळली आहेत ते पाहता एक अलौकिक व्यक्तिमत्व आपल्या आजूबाजूला गेली ७५ वर्ष सहजतेने वावरत आहे याचा अभिमान मनामध्ये भरून येतो.

खरे तर रामशेठ ठाकूर यांना पाहताना दोन गोष्टी मनामध्ये सहजच उमलून येतात, त्यातील एक म्हणजे त्यांचे शिक्षक म्हणून असणारे व्यक्तिमत्व आणि त्यांना असलेली साहित्याची अपार ओढ.. कोमसापचे प्रेरणास्थान असलेले कविवर्य केशवसुत त्यांच्या एका कवितेमध्ये साऱ्या अवतीभोवतीच्या समाजाला कवितेमध्ये गुंफून घेतात. की जिकडे जावे तिकडे माझी



अरुण म्हात्रे
सुप्रसिध्द साहित्यिक

भावंडे आहेत, सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत. खासदार म्हणून सर्वत्र वावरताना, लोकनेता म्हणून सर्वांची कामें करताना, सांस्कृतिक कार्यक्रमात प्रेमाने सामील होताना, अगदी शेकोटी संवेदनामध्ये एखाद्या उत्सुक मुलासारखे शेकोटी भोवती फिरताना रामशेठजी इतके साधे होतात ही तेथे जमलेल्या सर्वांना आपल्यापैकीच एक आहेत याची सतत खात्री वाटत राहते. त्यांचा शुभ्र वेश ही त्यांच्या शुभ्र व्यक्तित्वाची ओळख आहे.

त्यांच्या ७५ निमित्त त्यांच्यावरील कवितांचा हा शब्दगुच्छ ही त्यांची पारदर्शक अशी मिळकत आहे. एखादा

व्यावसायिक आपल्या हुशारीच्या आणि कष्टाच्या जोरावर खूप संपत्ती कमवू शकतो पण त्या संपत्तीबरोबर बरोबरीच्या लोकांचा स्नेह प्रेम आदर अभिमान आपुलकी आणि कौटुंबिक भावना ही फारच दुर्मिळ अशी गोष्ट आहे. एका अर्थाने महद भाग्य आहे आणि ते कोणातरी एका पुण्यवंतालाच मिळू शकते. रामशेठ ठाकूर यांनी हे पुण्य अक्षरशः मिळवलेले आहे. त्यांच्या अत्यंत साध्या अशा राहणीतून सुद्धा त्यानी अनुभवलेली गरिबी, त्यांनी खाल्लेल्या खस्ता आणि त्यातून उभारी घेऊन आभाळाएवढे उभे केलेले आपले अस्तित्व जाणवत राहते. माझ्या अगदी पहिल्या भेटीत सुद्धा मला आठवते, माझ्या शाळेतले शिक्षक त्यांच्या रूपाने मला भेटल्याचा आनंद झाला आणि पुढे हे आपले पण वाढत गेले त्याचे कारण त्यांचे कवितेवर असलेले अकृत्रिम प्रेम. अगदी आता नवीन लोकांच्या कविता ऐकताना ते जुन्या पाठ्यपुस्तकातल्या कवितांमध्ये जसे रमून जात असतील तसे रमून जातात.

एक कवयित्री राजस कल्याणकर म्हणते –

कवितेने तुज थोडेसे बळ द्यावे
थोडीशी कळ द्यावी
दगडामधुनी वाहता–वाहता
थोडी खळखळ द्यावी..!

रामशेठ ठाकूर यांचा व्यवसाय दगड मातीचा, बांधकामाचा. त्यामुळे त्यांना यावेळी अधिक जवळच्या वाटतील. दगडामधुनी वाहता वाहता त्यांनी इतकी खळखळ जमवली आहे ही व्यवसायातून बाहेर आल्यावर दुसऱ्या क्षणाला त्यांच्यासोबत असती हीच खळखळ.

गणेश कोळीने जेव्हा मला या ७५ कवितांच्या काव्य कुच्छाला प्रस्तावना द्यायला सांगितले तेव्हा मी थोडासा बावरून गेलो. कारण आभाळा एवढे मोठे व्यक्तिमत्व शब्दात पकडण्याचा प्रयत्न करणारे हे सगळे ७५ कवी या वाहणाऱ्या वाऱ्याला कितपत मुठीत घेऊ शकतील याची मला शंका होती. यामधून ते नवे काय सांगतील असा एक प्रश्न माझ्या डोळ्यासमोर होता. मात्र या ७५ कवितेच्या शब्दसृष्टीतून मी प्रवेश केला आणि मी अक्षरशः थक्क झालो. किती उपमा, किती रूपक, किती शब्दालंकार आणि किती दृष्टांत. खरे तर इथे इतर राजकारणी मंडळींशी तुलना करण्याचा माझा विचार नाही, तू नसायलाच हवा. पण तरीही राहून राहून मनात येते, हे असे प्रेमाचे आदराचे, सन्मानाचे गौरवाचे भाग्य अशा किती राजकारणी मंडळींच्या वाट्याला आले आहे.? सर्वसाधारणपणे कष्टकऱ्यांच्या किंवा शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी काम करणाऱ्या कोणालाही आपण केलेल्या कामाचा एक किंचितसा गर्व मनात बाळगावा लागतो. जणू त्याची कामाची जशी कमिटमेंट असते तशी त्या कामासाठी केलेल्या एका विचारधारेची सुद्धा कमिटमेंट असते. त्यामुळे व्यक्तीत्वामध्ये एक ताठरपण येतो, एकारलेपण येते, आग्रह येतो आणि कदाचित त्यामुळेच उरलेल्या सर्व समष्टीशी त्याला स्वतःला जोडून घेता येत नाही. रामशेठ ठाकूर यांचे नेमके उलटे आहे. स्वतःच्या दानशुरत्वाबद्दल अभिमान नाही, आपण केलेल्या कामाचा गर्व नाही, आपल्या काम करण्याच्या पद्धतीबद्दल श्रेष्ठ भावना नाही, किंबहुना आपण काही विशेष केले असाही अहंभाव मनात नाही.

त्यामुळे त्यांना मिळणाऱ्या टाळ्यांचे कौतुक नाही किंवा कोणी जाणून बुजून दुर्लक्ष केले तरी त्याबद्दल आकस नाही. फळाच्या, पाण्याने आजूबाजूच्या काठाकडे न बघत निमूटपणे वाहत राहावे तसे ते समाजाबरोबर वाहत असतात.

या ७५ कवितांमध्ये व्यक्त झालेल्या भावना अगोदर यातील काही कविनी रामशेठ ठाकूर यांना दिलेल्या उपमा पाहायला पाहिजेत.

कार्यसम्राट, लोकसेवक, लोकनेते, लोकप्रतिनिधी, दानशूर, भाग्यविधाता, सुशील, ऐश्वर्यवान, संकटमोचक ह्या उपाध्या त्याना सहज लाभल्या आहेतच पण त्याहून अधिक कौतुक वाटावे अशा काही प्रतिमा मन दिपवणाऱ्या आहेत.

उदाहरणार्थ काही पहा....

आशेचा नवा श्वास, कष्टाचे फूल उमलविले, समतेचा दीप, मायेचा पाझर, सरस्वतीचे उपासक, पाईक समाजाचे, चिखलामधून बागा, वटवृक्षासारखे अढळ, आत्म्याची रामबाग, ज्ञानाचा गोतावळा, हाताची यशोगाथा, कठोर परिश्रमांचे बाळकडू, असंख्य गुणांची मांदियाळी, अडल्यानडल्यांचे मदतगार, श्रमाचा संस्कार, चारित्र्याचा नेता, विठू माऊली होऊन तयांची, इत्यादी प्रतिमातून कविनी आपलें शब्दवैभव अर्पण केले आहे.

रामशेठ ठाकूर साहेबांच्या ७५ निमित्ताने त्यांच्यावरील कवितांचा संकलन प्रसिद्ध करावे हे मनात आल्याबद्दल मला गणेश कोळी याचे कौतुक करावेसे वाटते. करण मोठ्या मोठ्या लेखांमधून होणार नाही असा मोजक्या शब्दातून होणारा गौरव किंवा सन्मान किंवा केले जाणारे वर्णन इथे या ७५ कवितांच्या खासरीतून सहज मिळाले आहे.

कोणी गद्यात कोणी पद्यात, कोणी गझलेत आहेत कोणी अभंगात व्यक्त होऊन रामशेठ ठाकूर यांचे संपूर्ण चरित्र जणी या पुस्तकात आले आहे. या कवितांमधून त्यांचे मूळ गाव कळते, त्यांची पहिली शाळा कळते, त्यांचा व्यवसाय करतो, त्यांचे राजकारणातील स्थान कळते आणि जे तुम्हा आम्हा सर्वांना अत्यंत प्रिय आहे ती लोकांच्या मनातील आदराची कमान कळते.

कवयित्री दमयंती भोईर, उज्वला वामन दिघे, सौ संजना पगारे लोखंडे, स्नेहा राणी गायकवाड, चारुशीला म्हात्रे, डॉ. शैलजा करोडे, ऋता मनोज भामरे, राजश्री नामदेव तुळसकर, कामिनी खाने ह्या कवयित्रीच्या शब्द आविष्काराबरोबरच बापू फिलिप डिसोजा कुमठेकर, अनिल दाभाडे, धनराज विसपुते, अंकुश नथुराम जाधव, सोमनाथ घरत स्वामी, संतोष अंकुशराव सुतार, प्रभाकर करंजेकर, चंद्रकांत नारायण पाटील, रामचंद्र म्हात्रे, रामदास गायधने, प्राचार्य एस.एस. पाटील, डॉ. प्रभाकर गावंड, आदी मंडळींच्या कविताने लक्ष वेधून घेतले.

पनवेलची माती धन्य झाली,
वाईटांचा केला उच्छेद,
आकाशाची उंची गाठली
तरी मातीची वीण राखली!

अशा सहजसुंदर ओळी, माणसांच्या गर्दीने भरते गेट, असे आमचे रामशेठ! जनसेवेचे बांधून कंकण, मलेखणीतून स्फूर्तीझरा पाझरे अशा कैक कल्पनांचा वर्षाव सर्व कवी बांधवांनी नि भगिनींनी रामशेठ ठाकूर या त्यांच्या आदर्शावर केलेला आहे.

एखादे व्यक्तीमत्व इतके लीन असते, नम्र असतें, प्रसिद्धी टाळत असतें किंबहुना प्रसिद्धीपासून दूर पळत असते, अशा माणसाचे सुप्त गुण किंवा अपरिचित गोष्टी जगापर्यंत पोहोचतच नाही. त्यावर हे पुस्तक म्हणजे नेमके उत्तर आहे

नाव त्याचे एका ओठी भरून येतो ऊर
थोर मनाचे मुक्त दिलाचे रामशेठ ठाकूर!

अशा ओळीमधुनी काहींनी आपल्या भावना व्यक्त केल्यात तर त्याच चिवट मातीने गावा दिधला भाग्यविधाता अशा ओळीतून कोणी आमचे ठाकूर साहेबांचा गौरव केलेला आहे. एखाद्याचे व्यक्तिमत्व माहित असल्यावर त्यांच्या व्यक्तित्वातील उजळ गोष्टीच आपल्याला कळतात. मात्र खूपदा काही सुप्त गुण सुप्तच राहतात. कवितेचे हे पुस्तक म्हणजे रामशेठ ठाकूर या व्यक्तिमत्त्वाच्या चारित्र्याचे उघडे पुस्तक झाले आहे.

रामशेठ ठाकूर साहेबांना त्यांच्या ७५ च्या निमित्ताने शुभेच्छा देताना असे म्हणावेसे वाटते..

तुम्ही घेतला जो वसा संस्कृतीचा
जसा खोल आहे ठसा शिक्षणाचा
तसा काव्यपंक्ती मधूनी कविंच्या
आम्ही पाहिला आरसा प्रांजळाचा..

shabd.arungmail.com

रामशेठचा अमृत महोत्सव 'लोकोत्सव' का होतो?



मधुकर भावे

जेष्ठ पत्रकार

लेख

श्री. रामशेठ ठाकूर यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवस. ७५ वर्षे पूर्ण करून रामशेठ ७६ व्या वर्षांत पाऊल ठेवत आहेत. सामाजिक जीवनात किंवा व्यक्तिगत जीवनात, अनेक व्यक्ती ५०, ७५, ८० असे टप्पे पार करत असतात. सुवर्ण महोत्सव, अमृत महोत्सव, सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा, अशी वेगवेगळी नावे याकरिता आहेत. यातील बहुसंख्य कार्यक्रम कौटुंबिक असतात. त्या-त्या व्यक्तीपुरते आणि त्या-त्या कुटुंबाच्या आनंदाचे असतात. ते स्वाभाविक आहे. सत्तेत असलेल्यांचे वाढदिवस धुमधडाक्यात होताना आपण पाहतो. रामशेठ यांच्या बाबतीत ज्या अनेक कोड्यांची उत्तरे शोधावी लागतील, त्यातलं हे एक कोडं आहे.

रामशेठ गेली २५ वर्षे कोणत्याही पदावर नाहीत. आमदार नाहीत, खासदार नाहीत, पण सतत लोकांमध्ये आहेत. त्यामुळे पदावर नसताना रामशेठ यांचा ७५ वा वाढदिवस हा व्यक्तिगत न राहता सार्वजनिक का होतो, याचे उत्तर शोधले पाहिजे. ते उत्तर सोपे आहे. कोणत्याही पदावर, सत्तेत किंवा सत्ता पक्षात असल्यामुळे मोठेपण असा रामशेठच्या जीवनाचा लौकिक नाही. लोक त्यांच्याभोवती सदैव आहेत, त्यामुळे रामशेठ यांचा वाढदिवस हा व्यक्तीचा न राहता समष्टिचा होतो, सामुदायिक होतो हे सहसा न दिसणारे चित्र आहे. त्यामागे रामशेठ यांचे व्यक्तिमत्त्व दडलेले आहे. त्यांच्यातले माणूसपण जसे मोठे आहे, त्याचप्रमाणे त्यांचे दैनंदिन जीवनातले साधेपण त्याहून मोठे आहे.

सार्वजनिक जीवनासाठी दुर्मीळ असलेले अनेक सद्गुण त्यांच्या वागण्यात सहज व्यक्त होतात. त्यात देखावा नसतो, जाहिरातबाजी नसते. उजव्या हाताचे डाव्या हातालाही कळत नाही, पण लोकांना या बारीक तपशीलाच्या गोष्टी बरोबर माहीत असतात. व्यक्तीचे मोठेपण समजायला याच गोष्टी उपयोगी पडतात. रामशेठ यांचा अमृत महोत्सव लोकोत्सव व्हायला याच गोष्टी कारणीभूत आहेत, असे माझे निरीक्षण आहे.

शेकापक्ष रामशेठ यांनी सोडला. त्या पक्षापासून बाजूला होताना त्यांनी पक्षाविरुद्ध एकही शब्द उच्चारला नाही. एवढेच नव्हे तर त्यावेळचे मुख्यमंत्री विलासराव आणि प्रदेशाध्यक्ष श्रीमती प्रभा राव त्यांच्या पाठी लागल्या होत्या की, तुम्ही लवकर काँग्रेसमध्ये या. रामशेठ यांनी त्यांना नम्रपणे सांगितले की, २००४ च्या विधानसभा निवडणुकीत शेकापक्षाचे आमचे उमेदवार विवेकानंद पाटील यांना निवडून आणण्याचा शब्द मी दिला आहे. निवडणूक झाल्यानंतर मी नक्की काँग्रेसमध्ये येईन. स्वतः उभे न राहता पक्षातल्या आपल्या सहकारी उमेदवारासाठी इतकी स्पष्ट भूमिका घेणे यामध्ये रामशेठ यांच्या सामाजिक मोठेपणाचा प्रत्यय जाणवतो. एवढंच नव्हे तर शेकाप सोडताना त्या पक्षाचे भव्य ऑफिस

पनवेलमध्ये ज्या जागेत आहे, त्या जागेची मालकी रामशेठ यांची होती. पक्ष सोडताना त्यांनी त्या जागेच्या मालकीचा हक्क शेकापच्या नावावर कायदेशीरपणे करून दिला आणि पक्षाचा निरोप घेतला. रामशेठचा ७५ वा वाढदिवस असो वा कोणताही कार्यक्रम असो, तो कार्यक्रम सार्वजनिक का होतो याची कारणे यात दडलेली आहेत.

शे.का.पक्षाच्या कार्यकर्त्यांनाही आज रामशेठ त्यांचे वाटतात, काँग्रेसवाल्यालाही रामशेठबद्दल



आपलेपणा वाटतो. इंटकचे अध्यक्ष महेंद्र घरत हेही मोकळ्या मनाने त्यांचे अभिनंदन करताना संकोचत नाहीत. यात रामशेठ यांचे व्यक्तिमत्त्व दडलेलं आहे. रामशेठ केवळ दानशूर आहेत म्हणून लोक जमत नाहीत, त्यांच्या दानशूरपणाची जाहिरात ते करत नाहीत, पण सहजपणे सांगून जातात की,... माझ्याजवळ काय होते? मी वर जाताना काही घेऊन जाणार आहे का?.... एकदा असे झाले की, त्यांच्या घरी एका कार्यकर्त्याने त्यांना सांगितले शेठ, देवळात घाट बांधायचा आहे, काही पैसे द्या... रामशेठ यांनी खिशात हात घातला आणि त्याला हजार रुपये देऊन टाकले. तो म्हणाला हजारात काय होणार... रामशेठ यांनी आणखी हजार रुपये दिले. त्यावेळी मी तिथे बसलो होतो, माझे बोलणे झाल्यावर मी उठलो. बाहेर आलो, तो माणूसही माझ्या पाठोपाठ होता. तो त्याच्या बरोबरीच्या माणसाला सांगत होता की, ...शेठला कसा फसवला... मी ते शब्द ऐकले आणि माघारी गेलो... रामशेठना ऐकलेले शब्द सांगितले.. माझे मतंही सांगितले. रामशेठ यांनी काय म्हणावे?... त्याचे पाप त्याच्या जवळ, माझे पुण्य माझ्याजवळ... इतक्या सोप्या शब्दांत देणाऱ्याच्या स्वच्छ, शुद्ध मनाची ओळख त्यांनी करून दिली. त्यापेक्षा आणखी वेगळे उदाहरण... त्यांच्यासोबत त्यांचे जन्म झालेले घर बघायला एकदा न्हावाखाडीला गेलो. तिथे जात असताना बाजूच्या एका झोपडीवजा घरातील पडवीत एक मावशी बसली होती. त्या मावशीने सहज म्हटले शेठ बऱ्याच दिवसांनी आलाय... बरं असा ना... रामशेठनी खिशात हात घातला आणि हातात जेवढे पैसे आले ते त्या मावशीला देऊन टाकले. माझ्या मोबाइलमध्ये पटकन तो फोटो काढला. रामशेठच्या बरोबर रोज राहिलो, तर असे फोटो काढावे लागतील.

रयत शिक्षण संस्थेला सातारा येथे मुख्य संकुलात शिवाजी महाविद्यालयासाठी एक इमारत कमी पडत होती आणि संस्थेजवळ एवढा निधी नव्हता. अशावेळी रामशेठ यांनी ती भव्य इमारत स्वतःच्या पैशांनी बांधून दिली. त्या इमारतीचे लोकार्पण २७ डिसेंबर २०२१ रोजी देशाचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते झाले. त्यांनीच आग्रह करून या इमारतीला लोकनेते रामशेठ ठाकूर भवन हे नाव दिले. त्यावेळच्या भाषणात ते म्हणाले होते की, ज्या भूमीवर रामशेठ यांनी शिक्षण घेतले, त्या भूमीला ते विसरले नाहीत... कर्मवीर भाऊराव पाटील सांगायचे...मला जमीन द्या, मी त्याचे नंदनवन करतो. कर्मवीरांचे हे शब्द रामशेठ यांनी नंतरच्या पिढीत सिद्ध करून दाखवले. खऱ्या अर्थाने ते कर्मवीरांचे शिष्य आहेत, कारण रयत शिक्षण संस्थेबद्दल त्यांच्या मनात आत्मियता आहे. त्यांची शैक्षणिक मातृसंस्था रयत आहे.

संस्थापक भाऊराव पाटील यांच्या या संस्थेत लाखो तरुण शिकून मोठमोठ्या जागेवर गेले

आहेत. त्यापैकी अनेक धनाढ्यही आहेत, पण अशा या धनाढ्य माजी विद्यार्थ्यांपैकी संस्थेचा विस्तार होण्याकरिता स्वतःच्या श्रमाची थैली घेऊन कोणी पुढे आला असे उदाहरण दिसलेले नाही. त्यामुळेच रयत संस्थेचे माजी कार्याध्यक्ष श्री. अनिल पाटील जाहीर समारंभात असे सांगू शकतात हमारे पास रामशेठ है... याचा अर्थ समजून घेतला पाहिजे. आज रामशेठ यांच्या घरात पाऊल ठेवल्यावर दरवाजा उघडताच चार फोटो फ्रेम दिसतील. त्यात एक फोटो मातेचा, दुसरा फोटो पित्याचा, तिसरा फोटो राजकीय गुरू आणि रामशेठ यांचे सासरे श्री. जनार्दन भगतसाहेब यांचा आणि चौथा फोटो आहे तो कर्मवीर भाऊराव पाटील यांचा. रयतमध्ये शिकलेल्या कोणा विद्यार्थ्यांच्या घरी भाऊरावांचा फोटो आईवडिलांच्या बाजूला लावलेला आहे असे दाखवून द्या. यातला प्रत्येक फोटो रामशेठ समजून घ्यायला उपयोगी पडतो.

साताऱ्याचे उदाहरण दुर्मीळ आहे. त्याहीपेक्षा अधिक मोलाची गोष्ट वाटते ती ही की, नवीन पालघर जिल्ह्यात मोखाडा हे छोटेसे शहर आहे. ते आदिवासी वस्तीचे आहे. तिथे पूर्वी रस्ताही नव्हता. त्या जागेवर कर्मवीर भाऊरावांनी १०० वर्षांपूर्वी पत्र्याची शेड उभारली व उच्च शिक्षणाची सोय केली. भाऊरावांना आदिवासी भागात कॉलेज इमारत बांधावीशी वाटणं आणि ती इमारत मोडकळीला आल्यावर तिथे नवीन शैक्षणिक संकुल उभारून द्यावं असे रामशेठ यांना वाटणं... भाऊरावांची मानसिकता आणि रामशेठ यांची मानसिकता यांचं नातं किती घनिष्ट आहे असा विचार केला तर रामशेठही किती उंचीवर पोहचतात.

मोखाड्याला जाऊन रामशेठ यांनी शाळा नव्हे तर आर्ट्स, कॉमर्स, सायन्स कॉलेज उभारून दिले. ८ एप्रिल २०२३ रोजी त्या भव्य संकुलाचे कडक उन्हात लोकार्पण झाले. त्या कार्यक्रमाचे मुख्य पाहुणे श्री. शरद पवारसाहेबच होते. सर्व निधीची व्यवस्था रामशेठ यांनी केली. बरं, एखाद्या दानशूराने ते पैसे संस्थेला देऊन टाकले असते आणि इमारती बांधण्याचा विषय त्या संस्थेवर सोपवून दिला असता. रामशेठ राहतात पनवेलला. पनवेलपासून मोखाडा १३२ किलोमीटर आहे. त्यात २८ किलोमीटरचा सिंगल लेनचा घाट... रामशेठ यांनी सलग तीन वर्षे ५० ते ६० वेळा मोखाड्याला खेपा घालून या महाविद्यालयाची नवीन इमारत पूर्ण करून





घेतली. नाशिककहून रयतचे उपाध्यक्ष ॲड. भगीरथ शिंदे त्यांची गाडी घेऊन मोखाड्याला यायचे आणि पनवेलहून रामशेठ जायचे. प्राचार्य डॉ. एल.डी.भोर हा सगळा अनुभव सांगताना गदगदून गेले होते.

मी ज्या दिवशी ते कॉलेज पाहायला गेलो, तेव्हा घाट चढताना रस्त्याच्या बाजूला भर उन्हात आदिवासी भगिनी जमिनीवर बसून कैऱ्या, करवंद, कच्चे फणस, रस्त्यावर पानाचे वाटे मांडून विकायला बसल्या होत्या आणि त्यांच्या मुली मोखाडा येथे रामशेठने बांधलेल्या संगणकीय प्रशिक्षण वातानुकूलित हॉलमध्ये संगणकाचे शिक्षण घेत होत्या! ते सर्व पाहताना रामशेठच्या मोठेपणाला तोड नाही हे जाणवत होते. अनेक रात्री त्यांनी मोखाड्याला काढल्या. एक दोन वेळा असे झाले की घाट उतरताना त्यांची गाडी बंद पडली. त्या रस्त्यावर चुकून एखादी गाडी येते. गाडी बंद पडल्यानंतर रामशेठ गाडीतून खाली उतरले आणि घाट उतरायला सुरुवात केली. दोन किलोमीटर घाट उतरल्यानंतर एक ट्रक आला. त्या ट्रकला त्यांनी हात केला. ड्रायव्हरला थांबवले आणि ट्रकमधून ठाण्यापर्यंतचा प्रवास केला. गोष्ट छोटी आहे. फेसबुकवरही कुठेही फोटो झळकला नाही. रामशेठ यांचे मोठेपण स्वतःची जाहिरात न करण्यात जसे आहे तसेच त्यांच्या साधेपणात आहे. त्यांच्या स्वभावात जसा फरक पडला नाही तसा त्यांच्या पोशाखातही फरक पडलेला नाही. सामान्य लोकांना त्यांच्याबद्दलचा आपलेपणा वाटतो. त्यांना भेटायला अडचण येत नाही. सहज भेटता येते. आपली अडचण मांडता येते. ते मदत करतात. नाव विचारत नाहीत, गाव विचारत नाहीत, पक्ष विचारत नाहीत, जात विचारत नाहीत... अशी रोजच्या सकाळी ही गर्दी असते.

लोक रामशेठना दानशूर म्हणतात. दानशूर शब्दात दान देण्याचा एक अहंकारी भाव आहे. रामशेठच्या चेहऱ्यावर तो भाव कधी दिसत नाही. त्यांच्या नावातला शेठ हा शब्द त्यांच्या सहज कृतीमुळे पूर्णपणे गळून पडल्यासारखा वाटतो. त्यांची श्रीमंती प्रत्यक्ष दौलतीपेक्षा मनाने मोजली, तर त्याचे मोजमाप करता येत नाही.

रामशेठसोबत प्रवासात जेवढे लोक असतात,

त्या सगळ्यांना बरोबर घेऊन जेवणाची वेळ झाली की त्यांच्यासोबतच पावभाजी खायलाही त्यांना संकोच वाटलेला नाही आणि जेवण झाल्यावर सगळ्यात पुढे जाऊन झालेलं बिल द्यायला रामशेठच असतात.

अमृतमहोत्सव साजरा होत असल्यामुळे रामशेठ यांचं मोठेपण कळलं असं अजिबात नाही. ते मुळातच मनाने मोठे असल्यामुळे अमृतमहोत्सव हा कौटुंबिक कार्यक्रम न राहता सार्वजनिक आनंदोत्सव झालेला आहे. परवा पनवेलहून येताना काही ठिकाणी पाट्या पाहिल्या. कोणी आरोग्य शिबिरे घेतलीत... कोणी हरिपाठ जाहीर केला आहे, कोणी सत्यनारायणाची सार्वजनिक पूजा घालत आहेत, कोणी विद्यार्थ्यांच्या सत्काराचे कार्यक्रम ठेवले आहेत असे फलक वाचले. हे सगळे रामशेठ करवून घेत आहेत, असे कोणी समजत असेल, तर रामशेठच्या कृतज्ञतेची, समाजाची नस त्यांना कळलेली नाही, एवढेच म्हणता येईल. हा उत्साह लोकांमध्ये येतो याचं कारण रामशेठ यांना राजकारण कुठे करायचे ते समजते. राजकारणापासून ते दूर झाले आणि समाजकारणाचा वसा त्यांनी घेतला व तो शब्द पाळला.

आणखी एक गुणविशेष असा की रामशेठ शे.का.पक्षात होते तेव्हा शे.का.पक्षाचा आमदार पनवेलमधून निवडून आणला. १९५२ ला पहिल्या निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार आबासाहेब पन्हाळे पनवेलमधून विजयी झाले होते. १९५७, ६२, ६७, ७२, ७८, ८०, ८५, ९०, ९५, ९९, २००४, एवढ्या विधानसभा निवडणुकीत पनवेल मतदारसंघातून शे.का.पक्षाचा उमेदवार विजयी झालेला आहे. यापैकी ८० पासूनच्या प्रत्येक निवडणुकीत शे.का.पक्षाला मिळालेले विजय रामशेठच्या ताकदीमुळे मिळालेले आहेत. २००५ साली रामशेठ काँग्रेसमध्ये आले आणि २००९ च्या विधानसभा निवडणुकीत प्रशांत ठाकूर काँग्रेसचे उमेदवार म्हणून १९५२ नंतर पहिल्यांदा विजयी झाले. हा विजय काँग्रेसचा नव्हता, हा विजय रामशेठ ठाकूर यांचा होता आणि आहे. सर्वजण हे मान्य करतात. २०१३ ला रामशेठ भाजपमध्ये आले. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत पनवेलची जागा आयुष्यात पहिल्यांदा भाजपने जिंकली. प्रशांत ठाकूर भाजपचे आमदार म्हणून निवडून आले हाही एक इतिहासच आहे.

आधी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री बॅ. ए.आर. अंतुले आणि नंतर दि.बा. पाटील यांच्याविरोधात शे.का.पक्षातर्फे रामशेठ लढत असताना १९९८, १९९९ दोन्ही वेळा ते लोकसभा निवडणुकीत विजयी झाले. हा विजयही शे.का.पक्षाचा नव्हता, तो रामशेठ यांचा विजय होता. जर शे.का.पक्षाचा असता, तर खुद्द दि.बा.पाटील.. दत्ता पाटील याच लोकसभा मतदारसंघातून शे.का.पक्षातर्फे लोकसभेसाठी उभे राहिले होते. दोघेही पराभूत का झाले? रामशेठ मात्र शे.का.पक्षाकडून दोन वेळा विजयी झाले. मग विजय कोणाचा...? पक्षाचा की रामशेठचा? लोक रामशेठच्या बरोबर आहेत. हे रामशेठ शे.का.पक्षात असतानाही दिसते, काँग्रेसमध्ये असतानाही दिसले आणि आता भाजपमध्ये असतानाही दिसत आहे. यामुळेच रामशेठ यांचा अमृतमहोत्सव हा लोकोत्सव झाला आहे.

अनेक जणांचे अमृतमहोत्सव होतात, जाहीर सत्कार समारंभ होतात, वृत्तपत्रात जाहिराती येतात, पण वाचक ती पानं उलटून पुढे जात असतात. दुसऱ्या दिवशी तो वाढदिवस विसरला जातो. रामशेठ यांचा अमृतमहोत्सव वर्षभर चालणारा कार्यक्रम आहे आणि त्यात सामान्य माणूस मनापासून सहभागी झालेला आहे. म्हणून हा लोकोत्सव आहे. कोणताही माणूस जन्मसोहळ्याने मोठा होत नसतो... कर्तृत्व सोहळ्याने तो मोठा होतो. बारशाला ताशे, ढोल वाजवल्याने प्रत्येक बारसे झालेला कर्तृत्ववान होत नसतो. कर्तृत्ववान झाल्यानंतर ढोल-ताशे वाजत असतात. अशाच निवडक लोकांचा अमृत महोत्सव हा लोकोत्सव होत असतो. रामशेठ हे त्यापैकी आहेत आणि म्हणूनच वाढदिवसापूर्वी



२ जून २०२५ पासूनच त्यांच्या अमृत महोत्सवी वर्धापन दिनाचे कार्यक्रम सुरू झाले आहेत.

आठवण होत आहे विलासरावांची....

१४ ऑगस्ट २०१२ रोजी महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे निधन झाले. यापूर्वी दोन महिने दोन दिवस अगोदर म्हणजे २ जून २०१२ रोजी रामशेठ यांच्या ६१ व्या वाढदिवशी विलासरावांनी मुलाखत दिली होती. ती वाचताना आजही डोळे पाणावतील...

रामशेठ हा निर्मळ मनाचा माणूस आहे. मी त्यांना अनेक वर्षे पाहतो आहे.. जवळून पाहतो आहे, लांबून पाहतो आहे. त्यांच्यासारखा काम करणारा नेता प्रत्येक जिल्ह्यात असेल, तर महाराष्ट्राचे चित्र पालटायला वेळ लागणार नाही. म्हणून मी नेहमी म्हणतो की, प्रत्येक जिल्ह्यात विधायक दृष्टीचा आणि शिक्षण क्षेत्रात ग्रामीण विद्यार्थ्यांना संधी देणारा एक रामशेठ मला हवा आहे. रामशेठ स्वतःकरिता काही मागत नाहीत. त्यांना खासदारकी पुन्हा मिळाली असती, पण त्यांनी निवडणूक न लढवण्याचा निर्णय केला.

एकदा मला त्यांनी पनवेलला बोलावलं.. राजकीय कार्यक्रम नव्हता. कबड्डी स्पर्धेचे आयोजन होते. राजीव गांधी सुवर्णचषक कबड्डी स्पर्धा होती. शेवटचा सामना पंजाब विरुद्ध भारतीय रेल्वे होता. तो पाहत असताना अंगावर रोमांच आले होते. दुसऱ्यांदा पनवेलला गेलो. तो मल्हार महोत्सवाला, तिसऱ्यांदा पनवेलला गेलो तो प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाला. ५ ऑगस्टला २००५ ला. मुख्यमंत्री असताना, पण तिथे वाढदिवस नव्हता. स्वातंत्र्य सैनिकांच्या सत्काराचे आयोजन होते. प्रशांतला वाढदिवसाची काय भेट द्यावी याचा विचार करत होतो. तेवढ्यात रामशेठने सुचवले की, पनवेल एसटी स्टँडचा रस्ता क्रॉस करताना अपघात होतात. आम्हाला उड्डाणपूल द्या आणि मी ती मागणी जाहीरपणे मान्य केली. पुढच्यावेळी पनवेलला गेलो. तेव्हा त्यांच्या स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे भूमिपूजन करायचे होते. हा तपशील एवढ्याकरिता सांगतो की, रामशेठ हा राजकारणी माणूस नाही. तो सामाजिक नेता आहे.



असा सागरा सारखा आगरी

तुझा बाप आजाही चिखलात होता
तुझे राबले हात मातीत या

तुला लागता वेड या अक्षरांचे
नशीबास लिहिलेस भाळावरी

किती कष्टला अन् किती राबला सांग
मातापित्यांच्या ऋणा फेडण्या

दिला आसरा तूज अण्णांनी तेव्हा
शिका आणि कमवा दिला मंत्र हा

अहो शिक्षकाने किती भव्य उद्योग
इथे रायगडी मांडला हा असा

भरे लक्ष्मी ओटी आहे सरस्वतीची
असे दिव्य अप्रूप झाले इथे

दिले दान ज्याने हजारो हातांना
असे हात लाभोत या नगरिला

आम्हा स्पर्श व्हावा तुझ्या या हातांचा
तुझे फक्त अस्तित्व आम्हा पुरे

आला योग हा अमृताचा कलश आज
ओसंडती थेंब आम्हावरी

असा सागरासारखा भव्य आगरी
शतायुष मी मागतो ईश्वरा

अरे आयुरारोग्य लाभो तुला अन्
कुटुंबास तुझ्या करी प्रार्थना

– अशोक नायगांवकर
सुप्रसिध्द कवी





ह्या मातीचा थोर वारसा

नाम तयाचे घेता भरतो अभिमानाने ऊर
या मातीचा थोर वारसा रामशेठ ठाकूर

जन्मताच दुष्काळ पाहिला ओसाडी भरपूर
डोक्यावरती हंडे घेऊन निघती बाया दूर
पाण्यासाठी वणवण चाले डोळा येई पूर
उद्धारास्तव गावे आपली विकासास आतुर
रयतेचे अन बनले दैवत रामशेठ ठाकूर

वसा घेतला अन ज्ञानाचा रयत शिक्षणातून
झाली होती जाणीव त्यांना प्रारंभापासून
दिल्या देणग्या दिली उभारी अंत:करणातून
उभारली कॉलेजे शाळा संस्था संस्थातून
शिक्षक म्हणुनी व्रतस्थ साहेब अध्यापनात चूर
आजन्म शिक्षक ओळख म्हणजे रामशेठ ठाकूर

न्हावाखाडी गावांमध्ये होती पुरली त्यांची नाळ
जन्मजात पाहिले तयाने विस्कटले आभाळ
शिक्षण घेता कानी आली कर्मवीरांची साद
आणि ठरवले रयत शिक्षणा द्यावी अपार साथ
रयतेच्या उद्धारास्तव जणु अवतरला दानशूर
बनले लोकांचे ते नेता रामशेठ ठाकूर

व्यवसायाचे निमित्त जडले मातीशी नाते
आपसूक आले खांद्यावरती कष्टाचे जोते
थकलेल्या माणसा उचलणे ध्येय तेवढे होते
भूमिपुत्रांसाठी झाले संस्था निर्माते
शिकून सारे शहाणे व्हावे हा त्यांचा दस्तूर
पुण्यशील मातीचा सुपुत रामशेठ ठाकूर

– अरुण म्हात्रे
सुप्रसिध्द कवी





लोकनेता

न्हावेखाडीच्या भाळावरती एक कमळ उमळला
सुगंध सेवेचा दरवळताना प्रत्यक्ष परब्रम्ह पाहिला

पुण्यवंत विचारसरणीतून उगवला सूर्याचा गोळा
कर्तृत्वाचा महामेरू रायगडचा तो सुपुत्र शोभला

कमवा आणि शिका कर्मवीरांचा मंत्र त्याने जपला
ज्ञानार्थ्यास घडवणारा संस्कारक्षम शिक्षक झाला

शिक्षणाच्या वाटेवर सुप्रसिद्ध उद्योगपती जन्मला
माता पित्याच्या प्रेरणेत त्याला गरजूत देव दिसला

पूजा साहित्य देऊन सजवले त्या विद्येच्या उपासकाला
सढळ हाताने सहाय्या धावला रुग्णांच्या मदतीला

नेत्रुत्वाची गरज होती त्या काळी निद्रिस्त समाजाला
राजकीय स्थिती घेऊन ध्यानी योगी राजकारणात उतरला

कष्टकरी शेतकऱ्यांच्या हक्काचा तो खासदार बनला
संसदेत प्रामाणिक बळदंड अवघ्या जगाने पाहिला

लोककल्याणार्थ दानशूर लोकनेता प्रसिद्ध पावला
आप्पा बनून शकुंतलेच्या संसारात रामशेठ अवतरला



– श्री. न.ग.पाटील
अलिबाग–पनवेल



जनमनातील दीपस्तंभ

शिक्षणयात्री स्वप्नांचे शिल्पकार,
विद्येच्या वाटेवर दीप उजळणारे ।
गरीबांच्या डोळ्यात आशेची ज्योत,
संस्कारांचे मंदिर उभारणारे ।।

आनंदयात्री हसऱ्या मनाचे,
सुख-दुःखात सर्वांना कवटाळणारे ।
मितभाषी पण विचार महासागर,
शब्दांतून प्रेमच बरसवणारे ।।

सहकार्याची ज्यांच्या श्वासात गाथा,
समाजसेवेची अखंड साधना ।
कुटुंबवत्सल प्रेमळ व्यक्तिमत्त्व,
जनतेच्या मनात अढळ भावना ।।

ज्ञानी, संयमी, सच्चे लोकनेते,
रायगडचे भाग्यविधाते महान ।
कर्तृत्वाच्या तेजस्वी आकाशी,
रामशेठ ठाकूर नाव चिरंतन ।।

त्यांच्या कार्याचा सुवास दरवळे,
गावोगावी प्रेरणेची फुले फुलती ।
जनतेच्या हृदयसिंहासनावर,
रामशेठांचे आदर्श सदैव नांदती ।।



– डॉ. विनायक व्ही. लोहार
उपप्राचार्य, नवीन पनवेल



उत्तुंग कर्तृत्वाचे धनी

न्हावाखाडी जन्मगावी झाला निसर्ग कोप एक वर्ष
खाडी फुटल्याने गावात जगण्याचा वाढला संघर्ष

कायम कोरला गेला तो कुटुंबाचा श्रमाचा संस्कार
आजही जाणतात महत्वाचे श्रमजीवी परिवार

वडीलांसवे केले कष्ट ते शिक्षण मिळवण्यासाठी
होती प्रतिकुल स्थिती परि मनी ध्यास शिक्षणासाठी

रयत शिक्षण संस्थेशी जुळली नाळ गव्हाण येथे
साताऱ्यात कला शाखा प्रवेश घेऊन पदवी तेथे

नेते एन.डी. पाटलांचा लाभला पारस सहवास
उतरले रामशेठ कमवा शिका कसोटीस खास

उच्चशिक्षित झालात अतिशय परिश्रम घेऊन
निभविले समाज दायित्व खरे विद्यादान करून

रामप्रहर दैनिक सुरू केले दूरदृष्टी ठेवून
दिवाळी अंकांना अर्थसहाय्य दिलेत भरभरून

दानवीर पंचक्रोशीत जनतेत पसरली कीर्ती
प्रसिद्धी पराङ्गमुख मदतीला ते दान गुप्त किती

उद्योजक समाजसेवक शिस्तीचे पक्ष संघटक
पनवेलच्या विकासात झाले सदा संकटमोचक

महापूर असो किंवा कोरोना महामारीचे अरिष्ट
निवारणार्थ आपत्ती पुढाकाराने ध्येय साध्य इष्ट

केवळ रायगडच नव्हे तर राज्याचे उत्तुंग व्यक्तीत्व
स्वच्छ चारित्र्याचा नेता असे जपला स्वाभिमान स्वत्व

– बाबू फिलीप डिसोजा कुमठेकर
पुणे





शब्दांची ओंजळ!

किती लिहू? काय लिहू कार्य आपुले मोठे
शब्दामध्ये कसे वर्णावे शब्दच पडती थिटे

जन्म जाहला खेडेगावी काम डिजिटल केले
काम्पुटरच्या दुनियेलाही खेडोपाडी नेले

वेष पांढरा शुभ्र जाहला अंगावरती जरी
डोळ्यामध्ये स्वप्नं पेरली रंगीत अन भरजरी

देत राहिले दो करांनी रामशेठजी दानशूर
प्रत्येकाच्या मुखी पसरली ही कीर्ती सर्वदूर

क्षेत्र कोणतेही साहित्य, नाट्य, कला
आशीर्वादाचा हात आपण डोईवर ठेवीला

डोईवरती हाथ ठेवता बाप मनी आठवतो
सावली धराया आहात आपण हे मनी साठवतो

दीर्घायुष्य लाभो आपणा हे ईश्वराशी सांगते
ही शब्दांची ओंजळ आपल्या पायाशी वाहते

– ज्योत्स्ना राजपूत
पनवेल





दानशूर लोकनेता

रायगड जिल्ह्याची शान
महाराष्ट्राचा अभिमान
रयत शिक्षण संस्थेचे संचालक
गाजे सर्वत्र गुणगान...

दानशूर व्यक्तिमत्व
साधे असे राहणीमान
सर्वसामान्यांच्या मनाची
त्यांना आहे बघा जाण...

हुद्दा शिक्षक म्हणून
बांधली शैक्षणिक संकुले
विस्तारले त्यांचे जाळे
वीस हजाराहून शिकती मुले...

केले काबाडकष्ट अपार
ध्येय मिळविले सारं
साध्या शिक्षकापासून
बनले मोठे ठेकेदार...

जना-मनाच्या सुखासाठी
स्वीकारले राजकारण
निवडून खासदार बनले
झाले दिग्गजांचे हरन...

समाज सेवेत झोकणारा
असा नाही दुसरा नेता
दानशूर रामशेठ ठाकूर
आहे आमचा लोकनेता



– अजय शिवकर
केळवणे, पनवेल



जननायक

कर्तृत्वाचा हिमालय अन् माणुसकीचा झरा,
अमृतमहोत्सवी झळाळी, हा लोकनेता खरा!
रायगडच्या मातीचा पैलूदार हिरा,
रामशेठ नावाचा दरारा अन् प्रेमाचा उबारा!

उद्योजकतेच्या शिखरावर गाडले आपले नाव,
जिद्द आणि कष्टाने जिंकले अवघे गाव
यशस्वी व्यवसायाची आखली मोठी रेषा,
साधी राहणी अन् कामाची मात्र जबरदस्त नशा!

राजकारणात असूनही जपले समाजकारण,
दीन-दुबळ्यांच्या आयुष्याचे झाले तुम्ही तारण
गरजवंताचा आश्रय तुम्ही, मदतीचा हात,
अडीअडचणीत खंबीरपणे देता सर्वांना साथ!

शिक्षणाची द्वारे उघडून घडविली नवी पिढी,
ज्ञानाच्या प्रकाशाने तोडली अज्ञानाची साखळी
शैक्षणिक संकुलांतून उमलली हजारो स्वप्ने,
ध्येय बनले आजीवन त्याच स्वप्नांना जपणे!

माणुसकीचा पाझर ज्यांच्या हृदयात वाहतो,
असा आदर्श जननायक सारा महाराष्ट्र पाहतो
शतायुषी व्हावे आपण,हीच ईश्वराकडे प्रार्थना,
तुमच्या कार्याचा सुगंध दरवळो दाही दिशांना!



– नवनाथ एकनाथ ठाकूर
खिडकाळी



समाजकारणी

लोकनेते, विकासपुरुष जन्मा आले
पनवेल शहराचे सौभाग्य उजळले।।धृ।।
कर्मवीरांचे आदर्श घेतले
शिक्षकी पेशास स्विकारले
रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक झाले।।१।।
उद्योजक, राजकारणी बनले
लक्ष्मीचे ही वरदान लाभले
गरजू, दीनदु:खितांचे पितामह झाले ।।२।।
भाऊरावांचे कार्य अंगिकारले
समाजकारणी जीवन वाहिले
नावात शेठ परी साध्या रहाणीस पत्करले।।३।।
रायगडभूषण सन्मानित ठरले
धनश्रीने वैभवाचे दान पदरी दिले
पाऊल मात्र सदैव जमिनीवरच राहिले।।४।।
रामराज्य जनहितार्थ घडले
देवमाणूस नाम प्रजेने जोडले
लोकांप्रती रामशेठने तन-मन-धन अर्पिले।। ५।।



– चारुशीला रमेश म्हात्रे
कामोठे, पनवेल



माणुसकीचा ध्यास

ते गावाचा अभिमान
ते जनतेचा आधार !
रामशेठ ठाकूरांच्या
नावे उजळे दरबार..!१!

संघर्षाच्या वाटेवर,
सहज चालत गेले..!
जिद्दीच्या बळावर ते,
लढाई जिंकत गेले...!२!

मनात होती करुणा,
हृदयात होता विश्वास..!
गरिबांच्या डोळ्यात,
त्यांनी दिला प्रकाश...!३!

साधी राहणीमान,
उच्च विचारसरणी..!
मानवतेची सेवा करू,
आल्या जरी अडचणी..!४!

नेतृत्व त्यांच्या शब्दात
त्यांच्या कृतीतून दिसे..!
जनतेच्या हृदयात
यांचे स्थान खास असे..!५!

त्यांच्या मार्गाने चालणे,
ह्या पिढीला दिशा देते..!
असे महान व्यक्तिमत्त्व,
क्वचित जन्माला येते..!६!

जनतेची सेवा आणि
माणुसकी हाच ध्यास..!
हा अमृतमहोत्सव..
शब्दाने करुया खास...!७!



– स्नेहाराणी एस. गायकवाड
नवी मुंबई



देवदूत

काही लोकांचे जगणे
स्वतःसाठी नसते
त्यांचे जगणे..
समाजासाठी असते
त्यांच्या छत्रछायेखाली
आमच्या जीवनाचे सोने होते
लोकनेते रामशेठ सरांची
कर्तृत्वाची परिभाषा,
अशी निराळी असते
स्वच्छ पाण्याच्या लहरींवर..
त्यांच्या जगण्याची,
झळाळी दिसते
लाखो जणांच्या आत्म्याची
फुलवणारी रामबाग म्हणजे..
त्यांचे व्यक्तिमत्व असते
ज्ञानाच्या वर्तुळात,
ज्ञानगंगा वाहत असते
आकाशात उत्तुंग भरारी मारताना..
धरतीवरच्या पिल्लांकडे,
लक्ष त्यांचे असते
गोरगरिबांच्या मदतीसाठी
जीवन त्यांनी वाहिलेले असते
देवदूत जेव्हा धरतीवर अवतरतो
धरतीवर नवीन क्रांती घडवून आणतो
असा हा देवदूत,
यांच्यामध्ये झळकतो
सोनपावलांनी येऊन
आनंदाची बरसात करतो
ज्ञानशाळा बांधल्या
ज्ञानाचा गोतावळा जमला
ज्ञानाचे धडे घेत
युवक इथला ज्ञानसंपन्न झाला
ज्ञानाचे तेज आता नवतरुणातही झळकते
अशा या रामराज्यात कर्मभूमी अयोध्या भासते
राबणाऱ्या हाताची यशोगाथा, चैतन्यमय होते



– ऋता मनोज भामरे, पनवेल



रामबाग

बुडालं होतं ते गाव
अनं बुडाल्या होत्या त्या जागा,
रामशेठ ठाकूर साहेबांनी
फुलविल्या चिखलामधून बागा..

धकाधकीच्या जीवनात होत असेल चिडचिड
नका करू भांडण नका करू त्रागा,
या शांत दोन क्षण निवांत बसा
रामशेठ ठाकूर साहेबांनी आणलाय
सुखाचा एक धागा..

नका तोडू पान नका तोडू फुल
जरा प्रेमाने माणुसकीने वागा,
रामशेठ ठाकूर साहेबांनी आणलाय
सुखाचा एक धागा...

येथील पशु पक्षी रंगबिरंगी फुलपाखरे
त्यांची ही झाली हक्काने उदरनिर्वाहाची जागा,
रामशेठ ठाकूर साहेबांनी आणलाय
त्यांच्यासाठी ही सुखाचा एक धागा...

स्वप्नातली बाग सत्यात उतरवून दिली आहे निशुल्क सेवा
दानशूर कर्णाचा अवतार साहेबांसाठी दीर्घायुष्य मागा,
रामशेठ ठाकूर साहेबांनी आणलाय
सुखाचा एक धागा ...

बागेतील वटवृक्षासारखे अढळ स्थान फुलांसारखे
समाजात रंग भरण्याची कला
साहेबांचे सारे गुण घेऊन जोमाने कामाला लागा
कारण रामशेठ ठाकूर साहेबच बनलेत
साऱ्यांसाठी सुखाचा एक धागा..
साऱ्यांसाठी सुखाचा एक धागा..



– सोमनाथ र. घरत (स्वामी)
मु. खारकोपर, गव्हाण



गरिबांचा दाता

लोकनेते, माजी खासदार रामशेठ ठाकूर
समाजकार्य केले, अभिमानाने भरतो ऊर

उद्योजक, व्यावसायिक, श्रम केले खास
कष्टकऱ्यांच्या हाताला श्रमाचा चंदनी वास

गरिबांचा दाता रामशेठ, लोकजाणीव मनी
अमृतमहोत्सव विशेष, सौख्य मिळे जीवनी

राजकीय आदर्श अनोखा, प्रवास असे खडतर
जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य, सेवेत कायम तत्पर

लोकजीवनाचा विचार केवळ, कल्याण गोरगरिबाचे
रामशेठ यांस शुभेच्छा, औचित्य साधून वाढदिवसाचे

– सचिन पाटील
अलिबाग, रायगड





पनवेलचा कोहिनूर

ज्यांच्या नावातच राम आहे
अशा श्री रामशेठ ठाकूर यांच्याबद्दल
कितीही लिहायचं म्हटलं तरी
शब्द सुद्धा कमी पडतील

खरंच की आई किती भाग्यवान
जिने रामशेठ सारख्या पुत्राला जन्म दिला
जो पनवेलकरांच्या हृदयाचा मुकुटमणी झाला

त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली
वंचित दुर्बल घटकांना
आपल्या कुशीत घेतले
प्रत्येकाच्या सुखदुःखात सामील झाले
म्हणूनच लक्ष्मीचा वरदहस्त त्यांच्यावर राहिला

त्यांचा कर्णासारखा उदारपणा पाहिला की
मन भरून येते
पनवेलकरांचं खरंच भाग्य असं व्यक्तिमत्व
पनवेलमध्ये उदयास आलं

मालगुंडमधल्या केशवसुत स्मारकासाठी
त्यांनी भरगच्च मदत केली
ज्यांना मदतीची जरूर होती
अशा गरजू लोकांची स्वप्ने पुरी केली

आज त्यांच्याकडे सर्व सुख आहेत
पण त्यांना अजिबात गर्व नाही
असं व्यक्तिमत्व आता पुन्हा होणे नाही

त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षासाठी
मी मनापासून शुभेच्छा देते
व त्यांची पावले शताब्दीकडे वळोत
अशी इच्छा परमेश्वराजवळ प्रकट करते



– उज्वला वामन दिघे
खोपोली



रायगडचा विकासदीप

रायगडच्या मातीत उगवला एक तेजस्वी तारा,
जनमानसाच्या काळजाचा जो बनला सहारा ।
कर्तृत्व, सेवा अन् दातृत्वाचा वसा ज्यांनी घेतला,
रामशेठ ठाकूर या नावाने इतिहास रचला ।। १ ।।

शिक्षणाच्या अंगणी ज्ञानाचा दीप लाविला,
अज्ञानाचा अंधकार दूर सारून प्रकाश दाविला ।
सीकेटीच्या माध्यमातून स्वप्नांना दिली गती,
विद्यार्थ्यांच्या भविष्याची उजळली क्षिती ।। २ ।।

आदिवासींच्या दारी पोहोचली विकासाची गंगा,
दुःखाचा मिटला आता त्यांच्या मनीचा पंगा ।
रयतच्या छायेत सुखाचा हा ज्ञानाचा मळा,
प्रत्येक लेकराला लागला शिक्षणाचा लळा ।। ३ ।।

आरोग्य शिबिरांनी दिला जीवनाला आधार,
रुग्णसेवेचा मांडला त्यांनी पवित्र संस्कार ।
माणुसकीचा हात सदा मदतीला धावला,
दीन-दुबळ्यांच्या डोळ्यांतील अश्रू त्यांनी पुसला ।। ४ ।।

बचत गटांतून जागवली स्त्री-शक्तीची ज्योत,
स्वाभिमानाचे विणले त्यांनी प्रगतीचे पोत ।
महिलांच्या पंखांना दिले कष्टाचे बळ,
श्रमाचे त्यांच्या मिळाले आता गोड फळ ।। ५ ।।

खेळाडूंच्या जिद्दीला दिले मैदानी व्यासपीठ,
उलव्याच्या संकुलातून घडविले भविष्य नीट ।
युवकांच्या स्वप्नांना दिला विजयाचा विश्वास,
रायगडच्या क्रीडाविश्वात भरला नवा श्वास ।। ६ ।।

निस्वार्थ सेवेचा ज्यांनी लावला छंद,
समाजात पसरवला आनंदाचा गंध ।
रामशेठ ठाकूर म्हणजे प्रेरणेची मूर्ती,
दाही दिशात गाजते त्यांच्या यशाची कीर्ती ।। ७ ।।



– प्रा. स्नेहंकित मुनिश्वर सारंग
नवी मुंबई



ठाकूर सर

ठाकूर सर, आम्ही पाहिलाय, तुमचा जीवन प्रवास
खाडी पलीकडच्या वडघरच्या चाळीपासून
सोसाटीतल्या अलिशान बंगल्यापर्यंतचा....
आता तुम्ही रामशेठ, माजी खासदार वैगरे आहात
पण आम्ही तुम्हाला आर.सी. ठाकूर सर म्हणूनच ओळखत होतो
सायकलवरून मनमुराद पनवेलभर
मोकळेपणाने फिरताना पाहिलय
तुम्हाला आता तुमच्याकडे खूप अलिशान गाड्या आहेत
पण आठवते का तुमची ती सेकंडहँड हिरवी मारूती कार?
शाळा सुटल्यावर, वाशीवरून पनवेलकडे
येताना बेलापूरच्या थांब्यावरील
उभ्या आम्हा पनवेलकराना लिफ्ट देत
सांगत अरे बसा सर्व, आहे जागा,
नाही तरी मी एकटाच जाणार होतो
ती सेंकडहेंड गाडी सुध्दा खूप मजेत चालवायचे तुम्ही सर,
तुमचा जीवन प्रवास एखाद्या परीकथेतील राजकुमारासारखा
अद्भूत गरीबीचे वादळ वारे सोसत संघर्ष करणारा,
लढणारा मचव्या वरील रांध्या पासून एक खासदार,
आंदोलक, दानशूर, उद्योगपती, शिक्षक, प्रशासक,
संस्थाप्रमुखपर्यंतचा अशा अनेक रूपात पहातो आहोत
आज यशाची शिखरे चढताना आली कोठून कोठे?
असे मागे वळून पहाताना मागची पायवाट सोडून
आता हम रस्त्यावर आलात.. पण हा प्रवास सोपा नाही
तुम्ही संघर्ष केला, कष्टाळू स्वभावाने जिंकलेत परिस्थितीला
तुमच्यापासून शिकताना आम्ही एवढेच शिकलो सर
लहरोंसे डरकर नौका पार नहीं होती
कोशीस करने वालोकी कभी हार नही होती!



– डॉ. अविनाश पाटील
पनवेल



कार्यतत्पर

रामशेठ दादा...
तुमचं असीम दातृत्व
तुमचं अफाट नेतृत्व
प्रत्येकाच्या हृदयाशी भिडलेलं कर्तृत्व

रामशेठ दादा...
प्रत्येकाला दिलासा देणारं
सुखदुःखात सावरणारं
तुमचं दिलदार मन
अंतरंगात डोकावणारं

रामशेठ दादा...
समाजाच्या अडीअडचणीशी नाळ तुमची जुळलेली
शिक्षणाची ज्ञानगंगा तुम्ही तळागाळापर्यंत पोचवलेली
समाजाची उन्नती हाच तुमचा ध्यास
सोयी-सुविधांची कास तुम्ही धरलेली

रामशेठ दादा...
पंच्याहत्तरीचा उंबरठा तुम्ही लांघला
असच कार्यतत्पर उदंड आयुष्य लाभो तुम्हाला
मनःपूर्वक प्रार्थना अशी ईश्वर चरणाला



– मोहन भोईर
नवी मुंबई



व्यक्तिमत्व नामवंत

जनसेवा केली सदा
सर्वदूर गाजे कीर्ती,
गरिबांचे वाली थोर
अशी तुमची हो ख्याती

गर्व नसे तीळभर
नम्रभाव अंतरात,
समाजाच्या सुखासाठी
झटलात दिनरात

दानशूर रामशेठ,
सुसंस्कृत निष्ठावंत,
शान रायगडची हो
व्यक्तिमत्व नामवंत

जिद्द, चिकाटी, सातत्य
नसे मर्यादा कष्टांना,
ध्येय गाठले यत्नांनी
केले साकार स्वप्नांना

लाख लाख शुभेच्छांनी
वाढदिन व्हावा खास,
लाभो दीर्घायु आरोग्य
हीच प्रार्थना देवास



– प्रणाली मंगेश म्हात्रे
मुंबई



किंगमेकर

जे जे ज्याला हवे मिळावे असे दानशूर ।
पनवेल महानगरीचे नेते रामशेठ ठाकूर ।।

आरंभीचा काळ शिक्षकी पेशा गाजविला ।
उद्योगाची कास धरुनी उद्योजक झाला ।
समाजकार्यासाठी नित्य तत्पर उभा असा ।
कुणी ना विन्मुख जावे ऐसा घेतलासे वसा ।
दानधर्म अन् जनसेवेचा मांडियेला जागर ।।

'रयत माऊली' म्हणून झाले संस्थेचा आधार ।
संस्था स्थापून केला त्यांनी शिक्षणाचा प्रसार ।
रामशेठ मग म्हणता म्हणता लोकनेते झाले ।
पक्षासाठी खासदार होऊन शब्दाला जागले ।
दिल्लीमध्ये डंका वाजविला ठरले किंगमेकर ।।



– संदीप बोडके
कामोठे, पनवेल



कार्यकुशल रामशेठ

माजी खासदार ओळख दूरदूर
ते उद्योगपती रामशेठ ठाकूर
समाज, शिक्षण इत्यादी क्षेत्री
कार्य-कुशलता भरीव भरपूर...

स्वभाव छान मिळता-जुळता
जिद्द प्रश्नांचा सोडविण्यां गुंता
आदराने सर्वांना ते वागवती
प्रचिती येते साहेबांना भेटता...

विविध क्षेत्री अनं समाजसेवेत
जे गुणसंपन्न- पारंगत- हुशार
सरांकडून दखल घेतली जाते
सन्मानाने होतो त्यांचा सत्कार...

सर जन्मले आगरी समाजात
समाज अस्मिता जपती छान
जनसेवा उद्दिष्ट नसा - नसात
लोकनेते सरांची कीर्ती महान...

निरोगी- सुखमय- आनंददायी
दीर्घ आयुष्य लाभो साहेबांना
अशीच जनसेवा घडत राहावी
हीच सदिच्छा.... हीच प्रार्थना !!



- अरूण दत्ताराम म्हात्रे
जासई, उरण



भाग्यविधाते

पनवेलची माती धन्य झाली, ज्यांनी घडविला नवा विचार,
ज्ञानगंगा घरोघरी नेणारे, रामशेठ ठाकूर महान आधार।

अंधारलेल्या वाटांवरती, त्यांनी दीप ज्ञानाचा लावला,
गरीबांच्या स्वप्नांना त्यांनी, आशेचा नवा श्वास दिला।

शिक्षणाचा मंत्र जपताना, त्यांनी जीवन अर्पण केले,
विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी, कष्टांचे फुल उमलविले।

राजकारणातही त्यांनी, सेवाभावाचा ध्यास घेतला,
समाजहिताच्या कार्यातून, नवा इतिहास घडविला।

भूतकाळाचा आदर्श घेऊन, भविष्याचा वेध घेत राहिले,
प्रगतीच्या प्रत्येक पावलावर, त्यांनी यशाचे गीत गायिले।

पनवेलचे भाग्यविधाते, जनतेच्या मनातील विश्वास,
रामशेठ ठाकूर नाव घेताच, उमलतो सन्मानाचा सुवास।

त्यांच्या कार्याची गाथा अशी, काळाच्या पल्याड जाईल,
ज्ञान, सेवा, समतेचा दीप, सदैव जगामध्ये पेटत राहील।

– धनराज विसपुते
नवीन पनवेल



जनतेचा ध्रुवतारा

रायगडच्या मातीतून उगवला तेजोमय सूर्य,
रामशेठ ठाकूर नावात दडले आहे जनतेसाठीचे दिव्य कार्य
विकासाच्या वाटेवर स्वप्नांना दिली दिशा,
त्यांच्या कर्तृत्वाने उजळली प्रत्येकाची आशा
जननायक तो, जनतेचा स्पंदन बनला,
दातृत्वाच्या सागरातून सुखाचा झरा उगमला
कल्पवृक्ष जसा उभा, देई सावली अपार,
गरजूंच्या जीवनाला दिला आधार साकार
नेतृत्व ध्रुवताऱ्यासारखे, अढळ आणि स्थिर,
कर्तृत्वाच्या तेजाने झाला जनतेचा अधिर
दिलदार वृत्तीने जिंकली अंतःकरणे सारी,
प्रेमाच्या ओलाव्याने फुलली जीवनफुलांची वारी
सच्चा शिक्षक तो, ज्ञानदीप प्रज्वलित करणारा,
विद्यार्थ्यांच्या भविष्याला प्रकाश देणारा
मितभाषी स्वभाव, पण विचारांचा अथांग सागर,
कृतीतूनच घडविला यशाचा सुवर्ण प्रहर
कुटुंबवत्सल, मन, जपणारा प्रेमाचा धागा,
समाजसेवेच्या वाटेवर घेतला जीवनाचा जागा
पनवेलच्या विकासाचा जनक, जनतेचा अभिमान,
रामशेठ ठाकूर नावात दडला आहे महाराष्ट्राचा सन्मान
रामशेठ ठाकूर नावात दडला आहे जनतेचा अभिमान



– डॉ. सीमा कांबळे (सादळेकर)
प्राचार्या, नवीन पनवेल



शेठ

तुमच्याबद्दल लिहिताना शब्द
सुचतात मला आपोआप,
गोरगरीब जनतेची सेवा करता
तुम्ही बनून जणू मायबाप

कोणीही कितीही दुःखीजण आला
तरी तो जाताना जातो हसून,
कारण आस्थेने चौकशी करता
आपण त्याच्याजवळ बसून

गोरगरिबांचे सर्वच प्रश्न
आपणच मार्गी लावतात,
म्हणूनच आपणांस सारे
लोकनेते संबोधतात

आपल्या दानशूरतेची कीर्तीही
ऐकलीय मी कित्येकांच्या मुखातून,
कोणीही आजतागायत रिक्त हस्ते
गेला नाही आपल्या दारातून

शेठ, गोरगरीब जनतेबद्दल
तुमच्या मनात आहे मायेचा पाझर,
वाढदिवसादिनी आज काव्यातून
करतो तुमच्या नावाचा गजर

रामशेठ ठाकूर नाव उच्चारताच समोर
राहतो उभा विकास कामाचा डोंगर,
कर्तृत्व, कार्यशैलीमुळे असंख्य
जनतेच्या हृदयात शेठ आपल्या विषयी आदर

शेठ, आपल्या व्यक्तिमत्त्वाला
नम्रपणे मी जोडतो माझे हात,
परमेश्वर कृपेने तुम्हां लाभो
उदंड, निरोगी आयुष्याची साथ



– अंकुश नथुराम जाधव
कळंबोली



आधार!

चिखलात फुलावे कमळ सुंदर...
किंवा शिंपल्यात यावेत मोती
जीवन तुमचे हिऱ्यासारखे...
त्यास पैलू पडलेत किती !
अपार कष्ट.. अविश्रांत मेहनत...
मनी शिक्षणाची ध्येयासक्ती
त्याप्रति तुम्ही उभारिली... विद्यामंदिरे किती !
लोकहितास्तव समाजकारण निस्वार्थी,
राजकारणही केले-पण जनहितदक्ष
उद्योगपती ते 'लोकनेताही' झाले !
करुणाकर आणि दयाघन..
माया, ममतेचे सागर, दातृत्वही आपुले
लाखमोलाचे... जनता-जणांस आधार !
जनतेचे हे प्रेम अमर्याद... तुम्हां असेच लाभत राहो
'अमृतमहोत्सवी' वर्षाच्या आभाळभर शुभेच्छा
तुम्हां दीर्घ आयुरारोग्य लाभो!



– सुरेशचंद्र म्हात्रे
जेष्ठ साहित्यिक



रायगडचा जननायक

कर्तृत्वाचा सूर्य तळपतो, रायगडच्या या मातीवर,
आगरी कुळीचा मानबिंदू, नाव कोरले क्षितिजावर...
साधी राहणी, उच्च विचार, संयम हा ज्यांचा गाभा,
लोकनेते रामशेठ ठाकूर, व्यक्तिमत्त्व तेजोमय प्रभा...!

राजकारणात खंबीर उभे, जनसेवेचा घेतला ध्यास,
खासदार म्हणून दुमदुमला, कार्याचा झंकार खास...
सत्तेपेक्षा श्रेष्ठ मानलीत इथली माती अन् माणसं,
भूमीपुत्रांच्या हक्कासाठी, धरलीत दि.बां.ची कास ...!

शून्यातून विश्व उभारले, कष्टाची ज्यांना जाण,
यशस्वी उद्योजक म्हणून, वाढवली राज्याची शान...
कर्तृत्वाच्या शिखरावरती, पाय जमिनीवर स्थिर,
परिश्रमाने घडविले नशिब, तुम्ही जनसेवक धीर...!

संसदेच्या त्या सभागृहात, घुमला तुमचा आवाज,
जनतेच्या हक्कांसाठी, उभा केला संघर्ष खास...
राजकारणात राहूनही जपली, माणुसकीची नाती,
लोकनेते म्हणून तुमची, कीर्ती गाते ही माती...!

शिक्षणमहर्षी ओळख तुमची, तुम्हीच ज्ञानदीप ,
गरीब-दलितांच्या लेकरांचे, उजळले भविष्य समीप...
दानशूरतेचा हात तुमचा, कर्णाचा जणू अवतार,
सावली बनलात सर्वांची, जेव्हा दाटला अंधार...!

कार्यसम्राट या नेत्याचे, शब्द पडती अपुरे ,
लोकसेवेच्या यज्ञात तुम्ही, आयुष्य वेचले पुरेपुर...
अमृतमहोत्सवी वाटचालीला, हीच आमुची सदिच्छा,
निरोगी दिर्घायुष्य लाभो, हाच अंतरीचा मनोभाव...!!



– बी. एन. पाटील
कळवे, पेण



धन्य धन्य ही रामकथा

भाग्याच्या शोधात आधी ओसाड गाव जो होता
त्याच चिवट मातीने गावा दिधला भाग्यविधाता..

आभाळाच्या कृपेवरी जी भुई विसंबून होती
आगोटीच्या बरसातीची तिला प्रतीक्षा होती
आसुसल्या त्या मातीमधूनच असा निपजला दाता!.

कळले त्याला शिक्षण म्हणजे ज्ञानाचे भांडार
डोळ्यांमध्ये सदैव त्याच्या गावाचा उद्धार
त्यांच्या मजला शिक्षक झाला ज्ञानाचा उदगाता

अध्यापन सोडूनी शिरे तो परक्या व्यवसायात
हळूहळू व्यवसाय स्थिरावे कष्टाळू हातात
तरी कधीही गर्वाने तू नाहीं मिरवला माथा

व्यवसायाची कृपा अशी तो स्थिरावला धंद्यात
परि कधीही नाही सोडली सामान्यांची साथ
करूणा हृदयी त्याच्या बनला सामान्यांचा नेता

डोळ्यामध्ये गरीबी त्याच्या घरटी दगड विटांची
जगण्यासाठी दिसें लढाई गरीब भावंडांची
त्याच परिस्थितीने दिधली जनसेवेची संथा

आमदार खासदार पदांचे नव्हते त्या आकर्षण
जन्माचा उद्देश कळे की जीवन एक समर्पण
रायगडाच्या पुण्यभूमीचा एक पुण्यशील नेता

पनवेलीला जणु समंजस रामप्रहर लाभला
रामशेठ ठाकूर शब्द हा जनाधार जाहला
धन्य जाहला कवी प्रवीण हा रामकथा ही गाता



– प्रविण हाशिवरेकर
अलिबाग



शिल्पकार

अजुनही दान करणारा कर्ण नाही
पण राम आहे
लोकांच्या हृदयावर राज्य करणारा
लोकनेता राम आहे
गरजवंत आले कितीतरी अन्
तृप्त होऊन गेले
कारण त्यांच्यासमोर दान देणारा
दानशूर राम आहे
जात, धर्म अन् प्रांत याही पालिकडे
ज्यांचे नाव आहे
असा सर्वांना सामवून घेणारा
लोकनेता राम आहे
अण्णांच्या मागे रयतेची बाग
फुलविणारा माळी तोच आहे
नवनवीन रोपट्यांना तेज देणारा
सूर्य ही तोच आहे
जाण ठेवून गुरुदक्षिणा देणारा
एकलव्य ही तोच आहे
असा सर्वांचाही आदर करणारा
लोकनेता राम आहे
वरुन किती आले आणि गेले मात्र
येथे उभा तोच आहे
विकासाची स्वप्न पहात पहात
साकारत ही तोच आहे
आज बदलत्या परिवर्तनाचा
शिल्पकारही तोच आहे
सर्वाना सोबत घेऊन चालणारा
लोकनेता राम आहे
ऋण मातापित्यांचे फेडणारा
एकमेव पुत्र राम आहे
शिक्षण संस्थेला सासऱ्यांचे नाव देणारा
जावई राम आहे
म्हणून शिक्षणाच्या संकुलांवर
या साऱ्यांचेच नाव आहे
सर्वांवर मुक्तपणे प्रेम करणारा
लोकनेता राम आहे
कमावून शिकलेला कर्मवीरांचा
विद्यार्थी राम आहे
चिखलातून उगवलेलं कमळ सुद्धा
राम आहे
जेथे राम आहे तेथे सर्व आहे
विजय तर आहेच आहे
यशाची शिखरे सर करणारा
लोकनेता राम आहे

– प्रा. चंद्रकांत मढवी
नवीन पनवेल





साहित्यिकांनाही देई सन्मान

जनसेवेचे बांधुनीया कंकण
साहित्यिकांचा करी सन्मान
मधुभाईचे ते लाडके स्नेही
चोहिकडे पसरे किर्ती महान

गंध पुष्प दरवळे आसमंती
उत्कर्षाची चढतीच कमान
जनसेवेचा मनी वसा घेतला
साहित्यिकांनाही देई सन्मान

ऐश्वर्यवान, बुध्दीवान सुशील
मनानेही खरे खूप दिलदार
मदतीचा हात राही सदा पुढे
अडल्या नडल्यांचे मदतगार

राजकारणी नाव चमकले
समाजात मिळे मोठा मान
मंडळ वा साहित्य संमेलनी
मुक्तहस्ते करी नभ भुईला दान

कर्तृत्व तुमचे असेच बहरत राहो
साहित्तिकांनाही मिळे नित्य प्रेरणा
लेखणीतूनच मग स्फुर्तीझरा पाझरे
झरझर उमटे अंतर्मनातील भावना

माणुसकी,जिव्हाळा अन् प्रेम
नित्यच वसते तुमच्या जीवनी
खरे लोकनेते रामशेठ ठाकूर
गर्वदर्प लवलेशही नसे मनी

उदंड आयुष्य लाभो तुम्हासी
गरुडासम गगन भरारी घेई
सुवर्णासम जीवन सदा चमके
वाढदिवसादिनी शुभेच्छा देई

– रामदास गायधने
नवीन पनवेल





तारणहार

या भूमीचे सुपूत्र हृदयी रामशेठ
शिकविले, घडविले, भुमीपूत्र अनेक
कास धरली विज्ञान तंत्रज्ञानाची
नवी दिशा पनवेलच्या प्रगतीची

कष्टाने फुलविली आयुष्याची बाग
बागतेल्या फुलांचा सुगंधी दरवळ
पंचक्रोशीत वाहे सदैव परीमळ
प्रेमळ पत्नी,मुलांची त्याना साथ

फुलविले अनेकांचे संसार
अनेकांचे ते तारणहार
बालपणातले कष्ट सोबतीला
दैव होते त्यांच्या मदतीला

शेठ असूनी हृदयात राम
ठाकूर असूनही परोपकाराची जाण
विकासाचा कल्पतरू पनवेलची शान
वाढदिवस आजचा विकासपुत्राचा सन्मान



– कवी प्रनाद
(प्रवीण नारायण दवणे) डहाणू



कृतार्थ

अळवावरचा थेंब मानतो जो स्वतःला... निरर्थ आहे
जो जगताच्या कामी येतो जगणे त्याचे कृतार्थ आहे

जीवन संगर कधीच नसतो त्याचा स्वतःसाठी
प्राण घेतो तो लढावयाचा जगत्कारणासाठी
लक्ष भेदणारा योद्धा तो... आत त्याच्या पार्थ आहे
जो जगताच्या कामी येतो जगणे त्याचे कृतार्थ आहे

त्यास वारसा शूर शिवाचा अन बुद्धाच्या करूणेचा
वसे अंतरी ज्ञाना तुका अन वसा घेतला कर्णाचा
बिजामधुनी वृक्ष होतसे... जाणतो, हे मर्म आहे
जो जगताच्या कामी येतो जगणे त्याचे कृतार्थ आहे

विश्व निर्मिले शुन्यामधुनी तरी वेचतो माणूसपण
कृतज्ञतेने फेडत जातो मातीचे अन मातेचे ऋण
वटवृक्षापरी छाया देतो... तोच त्याचा धर्म आहे
जो जगताच्या कामी येतो जगणे त्याचे कृतार्थ आहे

थेंब थेंब तो जोडीत जातो अंती समुद्र होतो
चंदनापरी देह झिजवतो जगता परिमळ देतो
कर्माने तो घडतो येथे... हाच खरा पुरुषार्थ आहे
जो जगताच्या कामी येतो जगणे त्याचे कृतार्थ आहे...



– सुनिता रामचंद्र
नवीन पनवेल



रयतेतला राम

अनेक नेते होते पण हो कुणी ना वाटे राम
एक लाभले रायगडाच्या मग रयतेतला राम

शेतकरी अन् कामगारांचे प्रश्न सोडवे राम
संकट अडचण दूरच झाले पुढेच होते राम

शिक्षण विद्या मती मुरावे कारण झाले राम
अभ्यासाची गोडी लागण्या गुरुच लाभे राम

समाज प्रेरित होत रहावा नेते झाले राम
दीन दलितांच्या पाठीशी सतत रहावे राम

राजकारणी समाजप्रेमी पुरुषोत्तम हो राम
पनवेल नगरी शेठ एक हो ठाकूरांचे राम



– जयेश शिंदे
पनवेल



देवमाणूस

ज्यांनी शिक्षणात केली महान क्रांती
घरोघरी पेटविल्या ज्ञानाच्या ज्योती
अज्ञानी जीवनास दिले ध्येयवेडे पाठ
अंधाऱ्या आयुष्याला दाविली सुवर्ण पहाट

समाजाचे सुख, दुःख हृदयी जाणले
आम्ही त्यांस देवमाणूस मानले
आभाळी जसा शुक्रतारा दिसावा
तसा आमच्या अंतरी रामाचा विसावा

ते काळा संगे दिन रात लढले
तेंव्हा जीवाभावाचे मावळे घडले
राजकारणात जागोजागी सुरुंग पेरले
आता लढण्यासाठी शत्रूं ना उरले

उदार अंत:करणाने रोज वाटावे दान
रंजल्या गांजल्या जीवाचे ठेवूनी भान
देवा तुला आम्ही एवढेच मागणे मागावे
ह्या देवमाणसाला उदंड आयुष्य लाभावे



– सुभाष कुडके
नवीन पनवेल



असे आमचे रामशेठ

आकाशाची उंची गाठली
तरी मातीशी वीण राखली
सत्तेचीही चव चाखली
तरी झोळी न कधी माखली
प्रत्येकाच्या हृदयी थेट
असे आमचे रामशेठ....

सोडला शिक्षकी पेशा
उद्योगाने रुंदावल्या कक्षा
पूर्ण केल्या सर्वांच्या अपेक्षा
कुणाचीही न इथे उपेक्षा
कुणीही कधीही घेऊ शकता भेट
असे आमचे रामशेठ....

न्हावाखाडी जन्म जाहला
रायगडाने राम पाहिला
एक एक माणूस जोडीला
बघता बघता जमला काफिला
माणसांच्या गर्दीने भरते गेट
असे आमचे रामशेठ....

राजकारणातील किंग मेकर
शिक्षणातील केअर टेकर
लाखांचा होऊन पोशिंदा
अनेकांना दिली भाकर
व्यक्तिमत्व हे ग्रेट
असे आमचे रामशेठ....

पूर असो कि कोरोना
कोणतीही आपत्ती असेना
नेहमीच मदतीचा हात
समाजाचा विचार दिस रात
कधीही फिरली नाही पाठ
असे आमचे रामशेठ....

पंचाहत्तरी हा योग सुंदर
या रामाचे व्हावे मंदिर
सर्वांची ही श्रद्धा अपार
असा पुन्हा न होणे नर
अजरामर नाव हे मोठं
असे आमचे रामशेठ....



– संतोष सुतार, नवीन पनवेल



काही माणसं अशीही असतात...

प्रत्येकाच्या असण्यात कारण असतं म्हणे;
इथेही आहे...
राजकारण आणि समाजकारण!
पेशा शिक्षकाचा जरी आज नसला,
मुळांची छटा पानोपानी...
नाव रयतचं सुरुवातीतही
अन् कर्तृत्वातही...
जाणिवांच्या वाटा अशाच असतात...
काही माणसं अशीही असतात...

जिथं पुस्तकांना वाट नाही
शब्दांना त्या थाट नाही,
संधी देण्या पुढे सदा;
साहित्याच्या विशाल सागरी
यासारखा काठ नाही...
काही आधार असेही असतात...
काही माणसं अशीही असतात...

वारसा असा, जिथे कष्टाची साथ
ठसा असा, जिथे मदतीचा हात
खुणा कृतीने अपार जमल्या
अशी एक ही प्रेरणेची वात...
दातृत्वाचे, माणुसकीचे धागे असेही असतात...
काही माणसं अशीही असतात...



– कामिनी खाने
रसायनी



यशाचे शिखर

रामशेठ नावात किती पवित्रता
श्रीप्रभू रामचंद्राची होती त्रैलोक्यता
तशी रामशेठ ठाकूर सरांची लोकांत
जनसमुहात गावोगावी लौकिकता

संत साहित्याची आवड फार फार
दरवर्षी कवी संमेलनाची भरते वारी
नवकवी छोटे-मोठे कवी येती दुरुनी
कला, अध्यात्म, साहित्य, गोडी खरी

घेणारे हात हजार देणारा एकच हात
शाळा समाज राजकारण, शिक्षणात
मोठा वाटा दानाचा वाढतोच डंका
यशाचे डोंगर सरांना ऊंची दर्शवत

लोकनेते, माजी खासदार, कवी
बहुगुणी, प्रेरणादायी, उत्साही हिरा
अनुभवी भांडार वैभव लाभले फार
ज्ञानसागर अमृतासागर दानी झरा

आनंदाची शिदोरी ७५ वर्ष ही खास
शंभरी पुढची आयु सरांना मिळावी
सोनेरी, चंदेरी, रुपेरी, कुदंण, पाचू,
हिरे, मोती गुंफुणांची स्विकारावी शुभेच्छा



– रोहिणी श्रीकांत कोठावदे
डोंबिवली



कर्तबगार व्यक्तीमत्व

ज्याचे नाते शेतात कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांशी आहे
बुडी मारून रेती काढणा-या रेतक-याशी आहे
रस्त्यावर काम करणाऱ्या मजुरांशी आहे
शाळेतील खडू-फळ्याशी आहे
असे कर्तबगार व्यक्तीमत्व
रामशेठ ठाकूर -रामशेठ ठाकूर ।।

अशिक्षित अज्ञानी आई-वडील
बुडी मारून रेती काढण्याचा धंदा
दोन वेळचे जेवण मिळायचा वांदा
कमवा आणि शिका या योजनेचा आधार घेऊन
कर्मवीरांच्या गुरूकुलात ज्ञानतपश्चर्या करून
परिस्थितीवर मात करून पदवीचे शिखर गाठणारे
धेय्यनिष्ठ व्यक्तीमत्व
रामशेठ ठाकूर -रामशेठ ठाकूर ।।

ध्येयनिष्ठ माणूस कर्तबगार असतो
उद्योग-धंदे समर्थपणे सांभाळतो
कौशल्य-श्रमाचे मोल जाणतो
कामगार,मजुरांचा सन्मान करतो
उद्योजक म्हणून नावलौकिक मिळवितो
असे उद्योगशील व्यक्तीमत्व
रामशेठ ठाकूर -रामशेठ ठाकूर ।।

दीन-दुबळ्यांच्या व्यथा जाणतो
गरीब-गरजुंना मदत करतो
विद्यालये,देवालय उभारून
श्रध्दा भावनांचा आदर करतो
असे संवेदनशील व्यक्तीमत्व
रामशेठ ठाकूर -रामशेठ ठाकूर ।।



- रामचंद्र उधऱ्या म्हात्रे
कडेगांव, उरण



घातली गगनाला गवसणी

दीनदुबळ्यांचा तारणहार हा
वादळांवरी करी वार हा
पेटून उठला रणी
घातली गगनाला गवसणी
शेतांमध्ये घाम गाळून
बुडी मारून रेती उपसून
स्वप्न जागवी मनी
घातली गगनाला गवसणी
कामगार कळवळा दाटून
गोरगरिबांचा वाली होऊन
योध्दा लढला रणी
घातली गगनाला गवसणी
समाजसेवा कंकण हाती
मनामनांची जोडी नाती
खासदार मानाने भूषवुनी
घातली गगनाला गवसणी
हजारोंची स्वप्ने फुलवून
ज्ञानाची नवज्योत पेटवून
उद्योजक आगरी म्हणोनी
घातली गगनाला गवसणी



– चंद्रकांत नारायण पाटील
पेण



समाजप्रेमी

रायगडच्या पावन मातीमध्ये
शिक्षणाचा दीप लावला
दुर्गम भागातील लेकरांना
ज्ञानाचा उजेड दावला

स्वखर्चाने उभी केली
विद्येची ही सुंदर मंदिरे
रामशेठजींच्या कार्यामुळेच
बागडताहेत विद्यार्थिरूपी पाखरे

गरिबांच्या सुखासाठी
सदैव ज्यांचा पुढाकार
दीन-दलितांच्या आयुष्याचा
बनले ते आधार

आरोग्य असो वा सेवा
मदतीचा हात त्यांनी दिला
माणुसकीचा थोर वारसा
त्यांनीच हो जपला

मराठी साहित्य आणि कलेचा
त्यांनी नेहमीच सन्मान केला
कीर्तन महोत्सव अन् नाटकांसाठी
सढळ हाताने पाठिंबा दिला

सांस्कृतिक वारसा जपण्याला
त्यांनी दिली साथ मोलाची,
रामशेठजींच्या रूपात लाभली
सावली थोर माणुसकीची

साहेबांसारखी माणसं
लाखातून जन्माला येतात
'समाजप्रेमी' म्हणून
जनतेच्या हृदयावर राज्य करतात



– संतोष जाधव
कोपरखैरणे, नवी मुंबई



नेता

उत्कर्ष अन् उन्नतीचा
बीज मंत्र देऊनी
प्रगती पथावर चालले
कमळ निशाणी घेऊनी

विकासाची नवी यंत्रणा
उद्योग नवे साकारूनी
लोकनेते म्हणतो ज्यांना
आहे आमचे नेते गुणी

रस्ते शाळा रूग्णांसाठी
असतो नेता सदैव पाठी
दिन दुबळ्या अन् गरजवंताला
कायम बनतो मजबूत काठी

नेता असा हा कणखर अमुचा
बापच तो साऱ्या जनतेचा
लेकरांपरी जपतो साऱ्यांना
धर्म जपतो तो मानवतेचा

शान अमुची अभिमान अमुचा
रूबाब अमुचा, अमुची ऐट
भारतीय जनता पार्टीचे
लोकनेते फक्त रामशेठ...

लाभो उदंड आयुष्य
आमुच्या बाप माणसाला
पुन्हा पुन्हा निवडून यावे
गरज तुमची आहे जनतेला



– संजना पगारे लोखंडे
नवी मुंबई



कर्मयोगी...

रामशेठ ठाकूर..
राजकारणात, समाजकारणात,
शिक्षणक्षेत्रात मुरलेले एक साधं सालस,
प्रसन्न व्यक्तिमत्व..
नेतेपणाची झूल न वागवणारा
एक माणूस नितांत..
नेतृत्व जितकं डोळस
तितकच कर्तृत्व लखलखतं
जाणतेपणाची साक्ष देणारं..
कौतुक करण्यासाठी, शाबासकी देण्यासाठी
सदा तत्पर असलेलं दातृत्व झळाळतं..
एक चैतन्य सळसळतं
पर्णहिन खोडातून, हीरीरिनं धुमारलेलं..
रामशेठ ठाकूरजी आपण गाठालच शंभरी
वयाची याची साक्ष देणारं पंच्याहत्तरीतलं
तुमचं दमदार पदार्पण, तळपतं..



– दमयंती मो. भोईर
नवी मुंबई



रामशेठ

रा हणीमान जयाचे असे अगदी साधे
म नामनावर ज्यांचे अधिराज्य गाजे

शे तकरी, कामगारांचा असे त्यांना कळवळा
ठ सा आपुल्या कामाचा त्यांनी उमटवला

चां गल्या कामांना सदा दिले प्रोत्साहन
गु णी जनांचा त्यांनी केला हा सन्मान

ठा मपणे ते उभे राहूनी झाले यशस्वी राजकारणी
कु णापुढे ना झुकले केव्हा ते साऱ्या जीवनी
र यतेसाठी आयुष्य अवघे वेचले
पुण्यकर्म करूनी संचित हे साचले

राजकारण हे समाजसेवेचे साधन
त्यात मानले सदैव त्यांनी समाधान

लोकनेते ही सन्मानजनक बिरुदावली
लोकांनी ज्यांच्या नावापुढे लावली

रामशेठ या व्यक्तीमत्वापुढे नतमस्तक व्हावे
दीर्घायुष्य मिळुनी त्यांनी शतायुषी व्हावे



– डॉ. प्रभाकर गावंड
महाड



अभिष्टचिंतन

रामशेठ ठाकूर
प्रसन्न व्यक्तिमत्व
सामाजिक क्षेत्रात
मिळविल महत्त्व

शैक्षणिक मान्यता
पदवीधर गुरू
मिळविला सन्मान
विद्यादानही सुरू

जाहले खासदार
अंगातली धमक
रक्तातल औदार्य
मांगल्याची चमक

यशस्वी उद्योजक
घरोघरी धन्यता
मांन देती सर्वांना
मनाची संपन्नता

आवड साहित्याची
रमले लेखणीत
वेळोवेळी सहाय्य
त्यातही आनंदित

कसला नाही गर्व
तेजोमय वलय
राजकीय वैभव
नाही कसले भय

संपन्न उद्योजक
आयुष्यमान भव
विघ्नहर्त्या गणेशा
सदिच्छा एकमेव

– सीमा रिसबुड
श्रीवर्धन






साहेब

साहेब, आपण म्हणजे देवघरातील तुळशीपत्र
साहेब, आपण म्हणजे गरजवंताचा अस्सल मित्र
साहेब,आपण म्हणजे साऱ्यांचा अक्षय आधारवड
साहेब, आपण म्हणजे शिवरायांचा अजिंक्य गड
साहेब, आपण म्हणजे तहानल्याची पाणपोई
साहेब,आपण म्हणजे पाचुची आमराई
साहेब, आपण म्हणजे साऱ्यांसाठी प्रेमळ माय
साहेब, आपण म्हणजे दुधावरची घट्ट साय
साहेब, आपण म्हणजे दानाचं अक्षय पात्र
साहेब, आपण म्हणजे अखंड चालणारं दानसत्र
साहेब, वैशाखाच्या रणरणत्या उन्हात
कुणासाठी सावली झालात....
कुणासाठी माऊली झालात....
कुणासाठी भगवंत राऊळी झालात....
कुणासाठी भगवंत राऊळी झालात....



– रंजना संजय केणी
कळंबुसरे, ता.उरण



रामशेठ

नावात तुमच्या राम आहे लोकसुखाचे धाम तुम्ही संवेदनशीलता
नि सौजन्य अविरत तुमचे काम आहे माणूस म्हणून तुम्ही ग्रेट...
कर्मभूमी पनवेल तुमची रायगडाच्या इतिहासाची तनमनधन अपुले खर्च
करुनी वाढविली महाराष्ट्राची शान
तुम्ही सर्वश्रेष्ठ...
लोकनेते आदरातिथ्य सदैव अपुल्या ठायी जनसेवा हीच ईश्वरसेवा
आपल्याकडून होत राही
मानवतेचे चैतन्याचे बेट...
नेतृत्वाने कर्तृत्वाने दातृत्वाने फुलून आले अवघे जीवन गौरव केला
गुणीजनांचा कलांवत नि साहित्यिकांचा
थोर मनाचे दानशेठ...
रयतेत शिकले शिक्षक झाले उद्योगांची कास धरुनी शेठ झाले पण
जमिनीवर पाय अपुले दुःखितांचे अश्रू पुसले
मानवतेचे धरुन बोट...
अमृताची वाणी तुमची सौजन्याची करणी तुमची उच्च विचार साधी
राहणी कर्तव्याचा सुगंध दरवळे चोहिकडे घनदाट
कर्मवीर तुमच्या कृतीत आहे अण्णा तुमच्या उक्ती आणि वृत्तीत आहे
धोरण तुमचे नीतीत आहे शिक्षणाचा प्रसार केला
लावूनी नेट...
दान देऊनी मौन पाळता विचार वैभवाची शान आहे विचारांचे अधिष्ठान
आहे म्हणून आपणास बहुमान आहे रामशेठ सर्वश्रेष्ठ ....
अमृतमय हे आयुष्य तुमचे शतायुषी तुम्ही होवो
अन् जनतेची सेवा घडो हीच प्रार्थना ईश्वरचरणी रामशेठ !
तुमच्या कीर्तीचा ध्वज फडफडे
सह्याद्रीच्या कड्यावरी तुमच्या कीर्तीचा सुगंध
दरवळे महाराष्ट्राच्या भूमीवरी...



– रोहिदास पोटे
पनवेल



कार्यसम्राट

स्मरण झाले तुमचे आज मजला माझिया हृदयांतरी ।
म्हणोनी शब्द आहे पोटातुनी माझिया ओठावरी ।।
समाजकार्यात साहेब तुम्ही महान कार्याशिरोमणी।
अन् समाजकार्यात साहेब तुम्ही कार्यसम्राटही ।।
तुम्हांपाशी आहेत साहेब समाजकर्तृत्वाचे भांडार ।
अन् तुम्हांपाशी आहेत साहेब समाजकर्तृत्वाचे आगर ।।
गंध कार्यातला जणू नित्य फुलतो सोनचाफा ।
दरवळतो नित्य आज सुगंधीत चंदनापरी ।।
हळवे तुमचे समाजकार्य जणू काय तो वसंत ऋतू ।
बहरतो नित्य आज प्रत्येकाच्या मनातुनी ।।
संस्कारांचे अपार अंबर, संस्कृतीचे महासागर ।
बुद्धीचे महान आगर तुम्ही विद्येचे माहेरघर ।।
सोन्याहून पिवळे तुम्ही मोत्याहून शुभ्र ।
पाऱ्यापरी चकचकीत जणू कोहिनूर हिरा ।।
तुमचे प्रत्येक समाजकार्य जणू उत्तरेचा ध्रुवतारा ।
अन् तुमची प्रत्येक कार्यशक्ती जणू पहाटेची भूपाळी ।।
तुम्हांवीण साहेब आता समाजाला पर्याय नाही।
म्हणून समाज देतो नित्य तुमच्या कार्याची ग्वाही ।।
तुमच्या कार्याचा सुगंध समाजात बहरत आहे।
म्हणून सारा समाज करत आहे तुमचाच हेवा ।।
जिजाऊमातेचा आदर्श आहे तुमच्या हृदमंदिरी।
अन् छत्रपती शिवरायांचा अभिमान आहे
तुमच्या हृदयांतरी ।।
समाज क्षेत्रातले महान कार्यविशारद तुम्ही ।
अन् समाज क्षेत्रातले महान कार्यरत्नही तुम्ही ।।



– जनार्दन पाटील सोनखारकर
पेण–रायगड



उत्तुंग भरारी

ज्यांची किर्ती असे दूर दूर ऽऽऽऽऽ
ज्यांची किर्ती असे दूरदूर मोठे दानशूर फार मशहूर
पनवेलचा पालटला हो नूर नाव ते रामशेठ ठाकूर ऽऽऽऽऽ
न्हावाखाडी गावी जन्म झाला शिकत होते शाळा
परिस्थिती अतिशय वाईट बालपण
अतिशय कष्टात रामशेठ झाले मॅट्रिक रं ऽऽऽऽऽ
शिक्षणासाठी कमावणे भयंकर जीणे गेले
शिक्षण पूर्णत्वास मनाला शिक्षक व्हावे
ध्यास घडविला समाजाचा विकास ऽऽऽऽऽ
अशी घेतली मोठी भरारी ऽऽऽऽऽ
अशी घेतली मोठी भरारी उत्तुंग कामगिरी
उभारल्या शैक्षणिक संस्था उरामध्ये
सामाजिक आस्था मदतीचा हात ओघवता असा
हा सामाजिक नेता रं ऽऽऽऽऽ
पनवेल शहराचे रुप बदलले कसे समजले?
ऐका ना बाजूला अटल सेतू थेट घेतली
मुंबईची गळाभेट विमानतळी विमाने येती
जेट उघडले समृद्धीचे गेट
खासदार धन्य धन्य रामशेठ ऽऽऽऽऽ
खासदार धन्य धन्य रामशेठ ऽऽऽऽऽ

– संध्या विजय दिवकर
रोहा-रायगड





गोरगरीबांचे कैवारी

लोकनेते श्रीरामशेठ ठाकूर
जनतयाच्या वाढदिवसाला आतूर
रामशेठ गोरगरीबांचे कैवारी
कुणी कधी येवो तयाच्या दारी
विठूमाऊली होऊन तयाची
श्री रामशेठ समस्या दूर करी
अशा नेत्यावरी जनतेचा
भरभरून येतो उर....
जन तया वाढदिवसा आतूर

गोरगरीबांच्या दारी तयाने
नेली ज्ञानाची ती वाहती गंगा
संत होऊनि तयासंगे
गायिले छोटेमोठे ज्ञान अभंगा
ज्ञानकार्य पाहूनि जनाला
आनंद होई भरपूर....
जन तया वाढदिवसा आतूर

राजकारणातून समाजकारण
हे ठाकूर साहेबांचे धोरण
तयातून आमदारकीचे आणि
खासदारकीचे बांधिले तोरण
जन काढती अमृतमहोत्सवी
वर्षाचे लाख लाख शुभेच्छा सूर
जन तयाच्या वाढदिवसा आतूर



– एस. एस. पाटील
जोहे, पेण



रामशेठ

रायगडच्या पुण्य भुवरी
राम रत्न हा जन्मला
ज्ञानगंगा घरोघरी घेवून
थोर नेता हा घडला

महिमा तुमच्या दानाचा
रामशेठ नामे गाजला
दिव्यत्वाच्या दर्शनाने
पक्षाचा डंका वाजला

समाजकारण करता करता
राजकारणात सक्रिय सत्ता
उभारून भव्य शिक्षण संस्था
समाज ऋण ही तुम्ही फेडता

राजकारणाचा थोर वसा
मुलांनी तुमच्या जपला
पक्षनिष्ठा जपून सदा
वारसा पुढे चालवला

रामात आहे निसर्ग जाग
घडवली सुंदर रामबाग
जनसेवक हा आहे खास
सुंदरतेची त्याला जाग

रायगडचा शिल्पकार
खासदार हा विश्वास खरा
माणुसकीचा जिवंत झरा
ज्ञानपिपासा भागवणारा

आज आपली पंच्याहत्तरी
गाठावी उद्याची शंभरी
निरामय जीवनासाठी
मागणे ईश्वर चरणी

– रंजना मढवी
नवीन पनवेल





रामशेठ ठाकूर

लोकप्रिय नेते श्री. रामशेठ ठाकूर रायगड जिल्ह्याचे,
माजी खासदार त्यांना आमचा साष्टांग नमस्कार
त्यांना या पुढे ही, कुणी ना, विसरणार.....

जनहिताचे काम करणारे दिन दुबल्यांचे
अश्रु पुसरणारे कधी माघारी ना फिरणारे
दिलेले वचन पूर्ण करणारे आम जनतेचे,
आहेत ते जसे ते तारणहार
आया बहिणीचे रक्षण करणारे
अन्यायाच्या विरुध्द लढणारे
थोरा मोठ्याचे आदर करणारे
भारतीय परंपरा जपणारे श्री रामशेठ ठाकूर,
म्हणजे जसे श्री रामाचे अवतार
शिक्षणाचा पसारा त्यांनी केला
घरा घरात ज्ञान दिवा,
लावला त्याचे विचार विशाल महान त्यांनी
रायगड जिल्ह्याची वाढविली शान
त्याचा पारदर्शक नेहमी असतो कारभार
सुशतायुष्य लाभावे त्यांना,
आमच्या रामशेठ ठाकूर यांना
अशी करीतो आम्ही प्रार्थना,
श्री प्रभुजिंना जय आगरी आगरी,
मुखाने जय घोष करणार



– लवेंद्र मोकल
कळवे, पेण



रामामृत गीत

गौरव गान, गौरव गान, गौरव गान
जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था
आहे माझी शान ।।धृ।।

बीज रोहिले जनार्दनांनी
झेंडा रोविला रामसाहेबांनी ।।१।।

सन्मार्ग सुसंगती अपुली
स्वर्ण स्पर्श विचार कृतींची ।।२।।

अक्षरफुलांची सुगंधी ओंजळ
अपर्ण करणाऱ्या आतूर हे मन ।।३।।

अमृतवर्ष साजरा होत असता
हर्ष जाहला समस्त जगता ।।४।।

दिर्घ आयुष्य लाभो तुम्हां
पितृ दिप आधार आम्हां ।।५।।

नतमस्तक शतशः तुम्हां
हे भाग्य मिळाले मजला ।।६।।

– राधिका शिर्के
नवीन पनवेल





आपुलकीची सावली

खडतर होता जीवन प्रवास तरी थांबले ना ते चालताना
अंधारमय जीवन प्रवासात दिसली ना ज्योत जळताना
नशिबाशी झगडत होते दुःख भयंकर झेलताना
हतबल ना झाले कधी ते शिवधनुष्य पेलताना
स्वप्नं नव्हती खूप मोठी जीवनात ईथवर येताना
तुमचेच तुम्हा नवल वाटे घडले कसे हे पहाताना
मागे वळुनी पाहिले ना कधी उंचीवर जाताना
पाय असती ते जमिनीवर नभा येवढे होताना
मानवता ही ह्रदयी दिसली दान तुम्ही देताना
देव अंश दिसे अंतरी गरिबाला जवळ घेताना
गतकाळाची जाणीव असे अलौकिक सेवा करताना
पाहिले तुम्हां कित्येकांच्या काळजामध्ये भरताना
कृपा तुमची होता पाहिले ना काही कमी पडताना
विद्यार्थी असो वा कलाकार पाहिले तुम्हां मुळे घडताना
मन पाहिले तुमचे भरलेले ओसंडुनी वहाताना
घेणाऱ्याचे डोळे भरुनी आले प्रेम तुमचे नेताना
पाहिले तुम्हां आपुलकीची सावली होवुनी जगताना
मज माणसांतला देव दिसे रामशेठ यांना बघताना



– गणेश म्हात्रे
पनवेल

लोकनेते रामशेठ

अभिष्टचिंतन सोहळा नाही, प्रेरणादायी क्षण आहे
आज तुमच्या आठवर्णीमध्ये रेंगाळणारे मन आहे
नावाप्रमाणे तुम्ही सारथी झालात प्रत्येक क्षणी
तुम्हा लाभली असे सोज्वळ, शांत,
सात्विक सहचारिणी कर्तृत्वान गोजिरे दोन पुत्र असती
राजकुमार लेकी समान सूना आहेत तुमच्या राजनंदिनी छान राजबिंड्या
नातवंडांवर तुमचे प्रेम अपार... अशी **short but sweet family** छान आहे
आज तुमच्या आठवर्णीमध्ये रेंगाळणारे मन आहे ।। १ ।।

ज्ञानाचा दीप हातात घेऊनी शिकविली तुम्ही माणुसकीची
शाळा प्रेरणादायी ठरले प्रत्येक पाऊल रामशेठ ठाकूर – नाव म्हणजे तेजोमय
ज्वाला असे तुमचे व्यक्तिमत्त्व अलौकिक आहे, आज तुमच्या आठवर्णीमध्ये
रेंगाळणारे मन आहे ।। २ ।।

श्रमाने घडविले तुम्ही शिक्षण क्षेत्र कार्यशील असणाऱ्यांना
दिले तुम्ही छत्र तुम्ही आम्हा सर्वाचे लोकनेते
महान घरच्यांसाठी तुम्ही लाडके आप्पा आहात छान
अशी तुमची **Philosophy** खूप न्यारी आहे
आज तुमच्या आठवर्णीमध्ये रेंगाळणारे मन आहे ।। ३ ।।

नारळासम वावरणे तुमचे मनाला भावले
कधी कठोर तर कधी गोड मधूर ते भासले कधी गोड,
कडू, आबंट असे ही ते दिसले राजकारण
अन् समाजकारणाचे कोडे तुम्ही सहज सोडविले
असे तुमचे **Nature no.1** आहे, आज तुमच्या
आठवर्णीमध्ये रेंगाळणारे मन आहे ।। ४

तुमचे आमचे ऋणानुबंध छानसे जुळले गोर,
गरीब, जात-पात विसरून तुम्ही सर्वांना छान जपले
बालक-पालक यातील दुवा तुम्ही सहज जहाले
कौतुकाची थाप देताना तुम्ही कधी नाही संकोचले
असा तुमचा दिलदारपणा लय भारी आहे
आज तुमचा आठवर्णीमध्ये रेंगाळणारे मन आहे ।। ५ ।।



– शुभांगी मयुर म्हात्रे
पनवेल



ज्ञान पंढरीचे रामशेठ वारकरी

घेऊन जन शिक्षणाचा वारसा
परिवारात संस्काराचा ठसा
पंढरीच्या वारकऱ्यांची तुम्ही सेवाई
समाजाप्रती सदैव हो उतराई
विज्ञान-तंत्रज्ञानाची आवड
जनसेवेची अखंड धडपड
साहित्यप्रती आदर ममत्व
सृजनाचे सदा
आदरातिथ्य
माणुसकीचा निर्मळ झरा
ममतेचा प्रेमळ चेहरा
सोसूनी सदैव कष्ट
ध्येयाप्रती तुम्ही एकनिष्ठ
रामशेठ तुम्ही ध्येयाप्रती एककनिष्ठ
दीपस्तंभ तुम्ही मित्र सखा
न होई दुजा रामशेठ सारखा



– चित्ररेखा रवींद्रनाथ जाधव
पनवेल, रायगड



जनकल्याणाचा ध्यास

'रामशेठ' म्हणावं की 'दानशेठ'
असा कितीदा प्रश्न पडतो ।
साहेब, तुमची प्रतिमा जेव्हा आम्ही
डोळे भरून पाहतो ।
दोन्ही करही मग नकळत जोडले जातात ।
नयन पापण्या मात्र तुमच्या चरणी लीन होतात ।।१।।

रामरूपी वटवृक्ष म्हणजे,निश्चयाचा महामेरू जसा ।
सामान्य जीव सुखाने विसावेल,
असा सह्याद्रीसम आधार ज्याचा ।
असा हा आमचा राजा,
जनकल्याणाचा ध्यास अखंड मनी ज्याच्या ।।२।।

थोडक्यात समजणं,थोडक्यात समजावणं,
मुद्देसुदचं बोलणं,ही तुमची अनोखी कला ।
तरीही गोरगरीबांसाठी कंठ तुमचा नेहमीच गहिवरला ।।३।।

स्वानुभवाने जन्मलेला तुमचा प्रत्येक शब्द
जगण्याला उभारी देता ।



– नियती पाटील
पनवेल



कर्तृत्व, दातृत्व

कुणा माय बापाच्या घरी जन्म घ्यावा,
हे नसतं आपल्या हाती
पण आयुष्य कसं जगावं,
हे अधोरेखित करायचं आपणच आपल्या माथी
जिद्द आणि कठोर परिश्रमांचे बाळकडू,
ही तुमच्या माय पित्यांची संपत्ती
म्हणूनच कधी मागे वळून पाहिलं नाही,
जरी आल्या किती आपत्ती

शिक्षणाची आस मोठी,
रयत शिक्षण संस्थेचे झालात तुम्ही विद्यार्थी
मकमवा आणि शिकाफया योजनेतून बनलात,
स्वतःच स्वतःच्या आयुष्याचे सारथी
शिक्षक म्हणून काम करताना,
अनेक शिष्य झाले तुमचे लाभार्थी
विद्या दानासारखे दुसरे पुण्य नाही,
घडवलेत तुमच्यासम असंख्य विद्यार्थी

कष्टकरी गोरगरीब मुलांना शिक्षण देऊन,
वाढवली त्यांच्या जगण्याची उमेद
सामान्यांच्या न्यायासाठी लढताना,
स्वजनांशी संघर्ष करताना वाटला नाही खेद
कुणाचेही पाठबळ नसताना,
राजकारणातील तुमचे स्थान राहिले अभेद
सामंजस्य आणि खरेपणा राबवून,
दुष्कृत्य अन् वाईटांचा केला उच्छेद



कर्मवीर भाऊराव पाटील यांची,
मोखाडा गावातील रयत शिक्षण संस्था
आदिवासी लेकरांसाठी त्यांनी ज्ञानबीज रोवलं,
झेलून अनेक खस्ता
आज त्या रोपट्याचं वटवृक्षात रूपांतर केलंत,
तुम्ही न त्रासता
शिक्षणाने समाज सुधारतो,
ही तुमच्या काळजात गरिबांसाठी आस्था

कितीतरी याचक येती,
मोठ्या उमेदीने अन् आशेने तुमच्या दारी
मग आर्थिक असो वा सामाजिक,
रिकाम्या हाती न परतून जाती माघारी
कर्तृत्व, दातृत्व, सामाजिक बांधिलकी,
असंख्य गुणांची मांदियाळी सारी
अनेक थोरामोठ्यांचे आदर्श जतन केले,
आपण आपल्या मनाच्या गाभारी

तोच पेहराव जो पूर्वी होता,
त्यात नाही झाला कणभरही बदल
साधेपणा, प्रेमळ मन, माणुसकी,
तुम्ही म्हणजे शंभर नंबरी सोनं अस्सल
कुटुंबाची प्रेमळ साथ आहे आणि राहिल पुढे तशीच
निरोगी, दीर्घायु आयुष्यासाठी शुभेच्छा!



– राजश्री तुळसणकर
पनवेल



नव्या समाजाचे शिल्पकार

मायभुचे फेडीले असे पांग
नाव्हेखाडीच्या चिखलात,
सजविली-फुलवीली रामबाग....

कर्मवीरांच्या वट वृक्षाखाली,
स्व-कष्टाच्या भाकरीने
यशस्वी केले विद्या अध्यायन....

मातीचे सोने करूनी
जनसेवेशी जीवन अर्पण
स्फुर्ती दायी व्यक्तीमत्व....

शिक्षणाचा घेवूनी ध्यास
उभारूनी दिव्य शिक्षण संस्था,
नव समाजाचे शिल्पकार....

परीवर्तनाची घेवूनी मशाल
राजकारणात रोविले पाय
होवुनी खासदार घडविला इतिहास
असा सर्वमान्य लोकनेता....

आज साजरी पंच्याहत्तरवी,
शतायुशी निरोगी जीवनाची
करू साजरी आनंदाने शंभरावी
हिच प्रर्थना ईश्वर चरणी....



– ॲड. मनोज म्हात्रे
पनवेल



ज्ञानाची मंदिरे

काय वर्णू थोरवी मी शेठ.. रामशेठ.. तुम्ही महान दाता ।
येऊ दे संकटे कितीही तुम्ही योग्य तोडगा काढता।।

शिक्षकाची जिद्द चिकाटी आहे तुमच्या ठाई ।
राजकारणाची कास पकडून झालात साऱ्यांची आई ।
जनमानसात रूजवूनी तुम्ही बंधुभाव आणि समता।।

तुमच्या कर्तृत्वाचे तेज पसरले चोहीकडे ।
कार्य आणि विचारांना कला, साहित्य ही आवडे।
ना कळे आम्हास तुम्ही हे सहज कसे साधता।।

ज्ञानाची मंदिरे तुम्ही उभारलीत किती सारी ।
योग्य वाट दाखवण्या आम्हा करताय कष्टाची वारी।
आमची स्वप्ने पूर्ण करण्या किती तुम्ही राबता।।



– स्मिता गांधी
पनवेल



कर्मयोगी

कर्मयोगी धर्मयोगी महान एक धैर्ययोगी
सत्य, न्याय, करुणेचा ज्यांनी धरला मार्ग
जनसेवेचा अखंड असे ध्यास ज्यांच्या उरी
तेजस्वी कार्याने उजळली पनवेल नगरी

कर्मयोगी अथक अथांग कार्य सागर
धर्मयोगी सत्य न्याय निष्ठा निरंतर
धैर्य योगी वादळ संकट होती जरी निरंतर
एकच नाम राम तयास साजे हे अलंकार



– योगिनी वैदू
पनवेल



समर्थ नेतृत्व

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था रुपी
जहाजाचे कप्तान, आमचे आधारवड
आम्हा करीता मायेची ऊब असणार व्यक्तिमत्त्व
आमचे समर्थ नेतृत्व
आमच्या जीवनातील तुम्ही सर्वोत्कृष्ट कर्तृत्व
तुम्ही एकमेव प्रेरणादायी जीवनतत्व
तुमच्या समोर तुम्हीच एक दानशूर व्यक्तीमत्व
जगाशी आपलं जीवन जोडणारं व्यक्तीमत्व
निरपेक्ष मनाने काम करणारे व्यक्तीमत्व
आपलं काम करता करता इतरांना मदत करण्याची
भूमिका घेणारं व्यक्तिमत्व
शिक्षण सेवा, समाजसेवा करणारे, घडवणारे अवलिया
व्यक्तीमत्व रामशेठ ठाकूर साहेब तुम्हीच
आमचे एकमेव समर्थ नेतृत्व



– सुवर्णा वैदू
पनवेल



विकासाचा दीप

सागराच्या लाटांसारखा विशाल त्यांचा विचार,
वडाच्या छायेसम शांत, जनतेवर अपार आधार ।
गावागावांत उजळला त्यांनी विकासाचा दीप,
रामशेठ नाव घेताच जागा होतो विश्वास अन् स्नेहदीप ।।

शिक्षणाच्या मंदिरांना दिला त्यांनी नवा श्वास,
विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिला उंच भरारीचा आभास ।
ज्ञानाच्या वाटेवरती पेटवले संस्कारांचे दिवे,
गरीबांच्या डोळ्यांतील आशेचे बनले ते जिवे ।।

समाजसेवेचा झरा त्यांच्या अंतरी अखंड वाहे,
दुःखाच्या अंधाऱ्या वाटेवर मायेचे चांदणे राहे ।
जात-पात विसरून सारे माणुसकीचे गीत गातात,
हात धरून दुर्बलांचे नवे भविष्य घडवितात ।।

राजकारण त्यांच्या हाती झाले लोककल्याण,
सत्तेपेक्षा माणुसकीला दिले त्यांनी श्रेष्ठ स्थान ।
वादळांतही शांत राहून संयमाची शिकवण दिली,
सहकार्याच्या शक्तीने जनतेची मने जिंकून घेतली ।।

कुटुंबवत्सल मन जसे मंदिरातील पवित्र ज्योत,
नात्यांच्या उबदार छायेत फुलते प्रेमाची ओढ ।
कर्तव्याच्या रस्त्यावरती चालत राहिले न थकता,
स्वतः जळून इतरांना प्रकाश देत राहिले हसता ।।

समाजाला धरून पुढे जाण्याची त्यांची सुंदर रीत,
एकतेच्या वीणेवरती छेडली विकासाची प्रीत ।
शांत, सुसह्य, संयमी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची शान,
जनतेच्या हृदयामध्ये आजही त्यांचे अढळ स्थान ।।

अमृत महोत्सव हा नव्हे केवळ वर्षांचा सोहळा,
ही तर जनतेच्या प्रेमाने सजलेली सुवर्णफुलांची माळा ।
दीर्घायुष्य लाभो त्यांना, हीच ईश्वरचरणी प्रार्थना,
रामशेठांच्या कार्यातून उजळो समाजाची भावना ।।



– गणेश कोळी
पनवेल



वाढदिवसाच्या दिव्यज्योती

उत्साह आनंदाने भरलेला राहो आपल्या सुखाचा प्याला
वाढदिवसाच्या दिव्यज्योती घेऊन येवो उजाळा ।।

अश्रू ना येवोत डोळ्यात कधी
संघर्ष नसावा जीवनी कधी
सदैव राहो जीवनात तुमच्या वसंत तो फुललेला
वाढदिवसाच्या दिव्यज्योती घेऊन येवो उजाळा ।।

कांटेरी वाट नसावी जीवनाची
पायघड्या मिळोत नेहमी फुलांच्या
आयुष्यात नेहमी राहो पौर्णिमेचा चंद्र उगवलेला
वाढदिवसाच्या दिव्यज्योती घेऊन येवो उजाळा ।।

अपयश राहावे मैलोगणती दूर
यशाची विविध दालने खुलावी
आनंदी या क्षणांची सोबत सदैव मिळो जीवनाला
वाढदिवसाच्या दिव्यज्योती घेऊन येवो उजाळा ।।

साहित्याचे मेरूमणी उपासक सरस्वतीचे
सेवाव्रती दादा तुम्ही पाईक समाजाचे
तुमच्या किर्तीचा डंका वाजत राहो चहूबाजूला
वाढदिवसाच्या दिव्यज्योती घेऊन येवो उजाळा ।।



– डॉ. शैलजा करोडे
नेरुळ, नवी मुंबई



लोकनेते रामशेठ ठाकूर

काही व्यक्ती असतात समाजात
सुस्वभावी अन् मनाने थोर !
असेच आहे आमचे
लोकनेते रामशेठ ठाकूर..

शेठ तुम्ही तर आहात
जुने अन् जाणते !
म्हणून लहान थोर
तुम्हाला मानते..

अख्खी जनता
तुम्हाला नावाने ओळखते !
तुम्हीतर सर्वांचे चाहते
म्हणून तुम्ही आहात लोकनेते..

तुम्ही नावाने अन् मनाने मोठे
सारे दानशूर म्हणतात तुम्हाला !
तुम्ही खरोखरच लोकनेते आहात
याचाच अभिमान वाटतो आम्हाला..

नुकतीच तुम्ही पंच्याहत्तरी गाठली
अमृतमहोत्सवही साजरा झाला !
तुम्हा उत्तम आरोग्य लाभो, शतक होवो
हेच मागणे मागतो परमेश्वराला...



– अनिल दाभाडे
रसायनी



अमृत उत्सवाचा

अमृत उत्सवाच्या । या वाढदिवस भेटी ।।
पंचाहत्तर वर्षाच्या । या प्रेमानंदी गाठी ।।
रामशेठ ठाकूर या नावात । मोठी जादूच आहे त्यात ।।
परिवर्तन सदोदित । आणि वाढच होई मोठी ।।
किती नवलाई जिवन। तसे उत्साहाचे मन ।।
दर वर्षावर्षातून । वृध्दि-सिध्दि होती मोठी ।।
देवमाणूस असा जन्मला । की श्रीरामच अवतरला ।।
या पतितपावनासाठी । मन आतुरतेच भेटी ।।
की कर्णासम हा दाता । अन लाखांचा पोशींदा ।।
किती विशाल उदारता । आणि किर्ती त्यातून मोठी ।।
की फुलावे कमळाचे फुल । अन् वाहावा सुगंध झुळझुळ ।।
अन् मृणालांचाही उन्मेष । ही लाटच येते मोठी ।।



– काशिनाथ मढवी
नव-इतिहासकर, उरण



कुशल उद्योगपती

श्री मंतीपेक्षा माणुसकीचा ज्यांनी धरला मान,
रा यगड–महाराष्ट्रात घुमते त्यांच्या कार्याचे गुणगान
म नामध्ये सेवाभाव, जनतेसाठी अखंड प्रयास
शे कडो जीवांना आधार देणारा रयतेचा वटवृक्ष
ठ सुन दिसणारे विचार, दूरदृष्टी आणि नेतृत्व महान,
चां दण्यासारखे उजळले त्यांनी समाजाचे आभाळदान
गु ण, कर्तृत्व, दानशूरता यांचा सुंदर मिलाफ,
ठा कूर नाव दशदिशांना उजळविणारे कार्यच त्यांचा खरा विलास
कु शल उद्योगपती, जनतेचे लाडके माजी खासदार,
र यत सेवेचा आयुष्याचा अमृतमहोत्सव – जनतेला अभिमान अपार

– दर्शन कोळी
पनवेल





पुराणपुरुष

वडाच्या झाडासम उभी तुमची सावली,
रंजल्या-गांजल्यांना लाभे आधाराची माऊली
रयत शिक्षणाच्या त्या पवित्र वाटेवरी,
ज्ञानदीप बनुनी उजळले घरोघरी

वडासम स्थिर, विशाल तुमचे व्यक्तिमत्त्व,
रयतेसंगे जोडले शिक्षणाचे पावन तत्त्व
वडाच्या पारंब्यांप्रमाणे नाती रुजली,
प्रेमाच्या धाग्यांनी माणसे जोडली

काळाच्या ओघातही नाव तुमचे अजरामर,
जनमनाच्या हृदयात स्थान तुमचे निरंतर
सेवा, त्याग, माया यांचे सुंदर रूप,
रामशेठ ठाकूर - खरे पुराणपुरुष स्वरूप

आजही एखादा गरीब हात जोडतो,
डोळ्यांत अश्रू आणून आशीर्वाद देतो-
देवा, अशा माणसांना उदंड आयुष्य लाभू दे,
रामशेठांसारखी विभूती जगाने अनुभवू दे

आज पंचाहत्तर वर्षांचा सोहळा दारी,
आठवणी दाटल्या जनतेच्या अंतरी
कृतज्ञतेचे शब्द झाले आज अपुरे,
कारण तुमच्या कार्याचे ऋण राहील सदैव उरे



- ऋतुजा म्हात्रे-महामुनी
पनवेल



माणुसकीचा झरा

माणुसकीचा झरा येथूनच वाहतो
गरिबांच्या डोळ्यांतील अश्रू जो दररोज टिपतो,
त्यांनीच येथे पिकवले समाजसेवेचे मळे

नाही गर्व, ना पदाची हाव,
रामशेठ म्हणजे माणुसकीचे दुसरे नाव !
आरोग्य, शिक्षण, वा विमानतळाचे आंदोलन
सदैव मदतीचा दानशूर हात

अनाथ, दलित, गरिब
जनतेचा एकच आधार
रयत शिक्षण संस्थेतून
ज्ञानाची फुले वेचिली
कर्मवीरांच्या ज्ञानगंगेसाठी
तिजोरी मोकळी सोडली

ज.आ.भगत शिक्षण संस्थेमधुनी
गरिबांची मुले आज मानाने शिकू लागली
दुष्काळ असो वा कोरोना
राबवली मोदी भोजन योजना

संकटात धावून येणार पहिला जनतेच्या सुखासाठी
कष्ट सोसणारा हा रायगडीचा भुमीपुत्र खासदार
हॉस्पिटलची मदत असो वा
कार्यकर्त्याचे घरच्या लग्नाचा थाट,
रामशेठची सदैव मिळते साथ

प्रेमाने जिंकली लाखो मने
कोणालाही नाही पडू देत उणे
कोकणच्या दानशूर हरिश्चंद्राला सदैव प्रणाम



– विजय दत्तात्रेय गायकर
पनवेल



कृतार्थ जीवन

देवकीचा तो कृष्ण गोकुळी
यशोदेचा तो शाम झाला
जानकीवल्लभ आयोध्येचा
न्हावाखाडीही राम जन्मला

कृतार्थ झाले जीवन तुमचे
दिव्य तेजाने उजळून गेले
दीन दुखितांचे दैवत होऊन
अखेरचा तुम्ही विश्राम झाला

द्वेष कधी ना मनी बांधला
प्रेमाने जगभाव सांधला
ठकास मारून ठोसा कधी ना
त्यास सदविवेके आपला केला

कर्तुत्वाच्या उंच शिरावर
यशोगाण ते तुम्ही गाईले
जे केले ते उत्तुंग सारे....
अपयश ना तव समीप आला

निर्धार तुमचा चुकला ना कधी
निर्णय तुमचा झुकला ना कधी
बांधिली मंदिरे ज्ञानाची तुम्ही
दानतून जगण्यामध्ये कर्ण साधला



– विजय इंदुकेशव पवार
पनवेल



साधी रहाणी

म्हणतील सुजन तुम्हाला भले
उच्च राहिली विचारसरणी
तशीच तुमची साधी रहाणी
कष्टामधुनी जीवन घडले
म्हणतिल सुजन तुम्हाला भले

राजकारणी तुम्ही धोरणी
व्यवसायाची पायाभरणी
प्रथम गुरुचे धडे शिकविले
म्हणतिल सुजन तुम्हाला भले

उदार हस्ते वाटत धन कण
जनसेवेचे बांधून कंकण
सत्कार्याचे इमले रचले
म्हणतिल सुजन तुम्हाला भले

रयत माउली मानुनी अपुली
पिडीतांनाही दिली साउली
कृतार्थ जीवन अवघे झाले
म्हणतिल सुजन तुम्हाला भले

यश किर्तिचे चढले मजले
भाग्य स्वतःचे स्वतः घडवले
आयुष्याचे सार्थक झाले
म्हणतिल सुजन तुम्हाला भले

शब्दकळेची जाण तुम्हाला
गुणी जनांचे भान तुम्हाला
तुम्ही तर रसिकाग्रणी शोभले
म्हणतिल सुजन तुम्हाला भले

कितीकांची आयुष्य घडविली
शाळा विद्यालये उघडली
भजन किर्तनी मनही रंगले
म्हणतिल सुजन तुम्हाला भले

नामामध्ये राम असावा
कामामध्ये राम दिसावा
असे राममय जीवन झाले
म्हणतिल सुजन तुम्हाला

शतवर्षाचे आयु लाभो
भैरवीचे स्वर मंजुळ होवो
शुभेच्छा अर्पुन शब्दफुले
म्हणतिल सुजन तुम्हाला भले



– ॲड. सुनिता श्रीकांत जोशी
पनवेल



पनवेलाची शान

शिक्षक झाला नेता,
ध्येय त्याचे शिक्षण
रामशेठ हे नाव महान,
आमच्या पनवेलाची शान

माणूस जिद्दी खरा,
कामाचा घेई ध्यास पुरा
गरजूंना करितो दान
ठेवूनी दयाभाव सन्मान

राजकारणी तो दक्ष,
चौफेर तयाचे लक्ष
विकास केला छान,
त्याची जनता पंचप्राण

गुणी मुले दोन्हीही,
ठेवुनी पावलावरी पाऊल,
राजकारण अभ्यास करुनी
चढती एक एक कमान

उद्योगपती हा घेई भरारी
अनेक कामे भव्य उभारी,
असा विकास दैदिप्यमान
प्रगतीला येई उधाण

कितीक शाळा, किती मंदिरे
बालोद्याने, व्यायाम साधने
सन्मान कलाकारांचा त्यांच्या
मनात त्यांचे स्थान
आमच्या पनवेलाची शान



– माधव अभ्यंकर
पनवेल



भरारी

झालं कतिक न व्हतील कतिक नेते न् पुढारी
अमच्या शेट सारकी झेतली नाय कोनी अजून भरारी....
हाराचेच शिक्षक शेट, त्येंना माईत शिकाचा मत्व
राजकारनात ऱ्हाऊन पुन त्येंनी, सोरली नाई तत्व
जयां –तयां उबारली त्येंनी, शाला न महाविद्यालयां भारी
अमच्या शेट सारकी झेतली नाय कोनी अजून भरारी....
जो आला त्येंच्या दरबारी, जेला नाय खाली हात
गरिब असो वा शिरीमंत, दिली समद्यानाच साथ
गरजवंतांना न पिरितांना, त्येंनी दिली सदा उभारी
अमच्या शेट सारकी झेतली नाय कोनी अजून भरारी....
साईत्यिक न कलाकार, त्येंना नेमीच भावती
त्येंच्या संगती रमताना ते राजकारन इसरती
खेलाडू न कलावंतांशी, त्येंना दोस्ती वाटे प्यारी
अमच्या शेट सारकी झेतली नाय कोनी अजून भरारी....
वलांडली सत्तरी तरी, करिती रयतेसाटी काम
लोखां म्हनती त्येंच्यामुळेच, शिल्लक राजकारनात राम
शुबेच्छा न आशीर्वाद देई म्हंगुनच जनता सारी
अमच्या शेट सारकी झेतली नाय कोनी अजून भरारी....



– राजेंद्र नाईक
उरण



शिक्षणप्रेमी लोकनेता

शिक्षणाचा नवा अध्याय
असं ज्यांचं कार्य बोलतं,
ज्ञानाच्या प्रत्येक वाटेवर
त्यांचं नाव आदराने घेतलं जातं ।।

लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब महान
कर्तृत्व, दातृत्व, नेतृत्वाचा, जनमानसातील,
समाजातील आम्हा साऱ्यांचाच ते अभिमान!

विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना ज्यांनी दिलं
नव्या उमेदीच आकाश,
संस्कार आणि प्रगतीसाठी जपला
आयुष्यभर शिक्षणाचा ध्यास ।।

शाळा, महाविद्यालयांच्या रूपाने
अनेक ज्ञानमंदिर उभी राहिली,
रयत शिक्षण संस्थेला जणू
दातृत्वाची अनमोल देणगी मिळाली ।।

७५ व्या या अमृतक्षणी
सारा समाज करतो अभिवादन,
तुमच्या कार्याच्या तेजाने उजळू दे
नव्या पिढीचे प्रत्येकाचे जीवन ।।

ईश्वरचरणी एकच प्रार्थना
आपणास उदंड निरोगी आयुष्य लाभो अपार,
तुमच्या शैक्षणिक कार्याचा तेजस्वी तारा
चमकत राहो साता समुद्रापार ।।

– दर्शना प्रफुल्ल माळी
उरण





तू संविधानाचा प्रदीप...

प्रेमाचा तू सागर । धैर्याचा मेरू सुंदर ।
करुणेचा अखंड निर्झर । वाहतसे ।।१।।

विश्वासाचा वटवृक्ष । श्रद्धेचा तू दीप लक्ष ।
शील तुझे चंद्रासम । निर्मळसे ।।२।।

अन्तःकरणात बुद्ध । विचारांत सत्यशुद्ध ।
करुणेमध्ये सम्यक युद्ध । अन्यायाशी ।।३।।

सम्यक दान तुझे हाती । उजळल्या कित्येक वाती ।
दीनांच्या त्या डोळ्यांती । आनंद फुले ।।४।।

दान देणारा हात । दुःखितांशी जिवलग नातं ।
कल्पवृक्ष ममतेची जात । तुझ्यामध्ये ।।५।।

कष्टकऱ्यांच्या घामाला । मान दिला जीवाभावाला ।
कमवा आणि शिका भला । मंत्र दिला ।।६।।

त्याग तुझा दीपस्तंभ । वादळामाजी अचल खांब ।
स्वप्नांचे तू कुशल शिल्प । घडविता ।।७।।

नवनिर्माणाचा ध्यास । अंतरी जळता प्रकाश ।
जनहिताचा अखंड श्वास । तुझ्यामध्ये ।।८।।

प्रतापगडच्या वाटेवर । चालतसे निर्धार थोर ।
शिवरायांचा खरा वारसदार । दिसतसे ।।९।।

स्थितप्रज्ञ हिमगिरी । शांत राहसी अंतरी ।
संकटांच्या त्या लहरी । न डुलविती ।।१०।।

तुकारामांच्या वाणीचा । गंध तुझ्या जीवनीचा ।
साधेपणाच्या फुलांचा । दरवळसे ।।११।।

निर्मळ गंगेचे पाणी । तसे तुझे शुभ्र मनी ।
द्वेष नसे अंतःकरणी । कणभरही ।।१२।।

व्यवहाराचा तू ज्ञाता । माणुसकीचा खरा नेता ।
मनस्वभावाची कथा । जाणसी तू ।।१३।।

पुण्याचा मोठा ठेवा । सद्गुणांचा कुबेर वा ।
कळवळ्याचा जणू मेवा । लाभलासे ।।१४।।

विरक्त कमळापरी । राहोनी जगाच्या घरी ।
अलिप्त भाव अंतरी । जपलासी ।।१५।।

देतो तो देव खास । अर्थ कळला तुझिया मनास ।
हात दिला दु:खितांस । सावली होई ।।१६।।

फुले-आंबेडकरांचे । कर्म,धर्म नेले जगात ।
या नव्या युगात । समतेचा वारकरी ।।१७।।

संविधानाचा प्रकाश । उजळवी जनमनास ।
समतेचा अखंड श्वास । तुझ्यामध्ये ।।१८।।

ध्यासपर्व तुझे जीवन । आशावादाचे गगन ।
दुर्दम्य आशेचे किरण । झळकती ।।१९।।

सात्त्विक कुळातील बाळ । नित्य सत्कर्म अमृतकाल ।
दु:खितांचा जीव्हाळ । जपलासी ।।२०।।

जगन्मित्र तुझे नाते । प्रेम पेरिसी गावोगावाते ।
दारी तुझ्या सुख नांदे । मंगलते ।।२१।।

जयजयकार व्हावा । ऐसा तुझा जीव ।
संतपरोपकारी भाव । तुझ्यामध्ये ।।२२।।

विवेकाचा जागा दीप । विज्ञानदृष्टीचे रूप ।
अंधश्रद्धेवरी घाव । घालितसे ।।२३।।

आनंदी तुझे वदन । पहाटेचा जणू किरण ।
भगवंताचे चालते धन । दिसे जनी ।।२४।।

सांगे भीड भीकेची बहीण । स्वाभिमान, कष्टभूषण ।
ज्योतीरावांचे स्मरण । ठेविसी तू ।।२५।।

कर्मवीरांचा वारसा । जनसेवेचा धगधसा ।
दलितांचा प्रेमळ बाबा । झालासी तू ।।२६।।

शांतीप्रेमी जीव तुझा । चंदनाचा गंध साजा ।
निसर्गाशी स्नेह तुझा । हिरवागार ।।२७।।

कृपाळू पावसापरी । बरससी जनांच्या घरी ।
कोरड्या जीवनावरी । हिरवाई देशी ।।२८।।

जन्मा येउनी केले सिद्ध । होऊ नका कोणी क्रुद्ध
जीवन हे नित्य युद्ध । एकमेकाधारे जगावे ।।२९।।

रामशेठ समतेचा द्वीप । जनमनांच्या सदा समीप ।
भारतीय संविधानाचा प्रदीप । जगा उजळीतसे ।।३०।।



– प्रा. डॉ. सुभाष वाघमारे
सातारा



समाजसेवक

समाजसेवेचा धरला ध्यास
जनतेचा संपादूनी विश्वास
रामशेठ नाव आहे खास ।।धृ।।

शिक्षणाची धरूनी आस
गरजूंना दाखविली वाट ।।१।।

गरीबांशी मायेचा आधार
समाज सेवेत तत्पर ।।२।।

उज्वल भविष्य देण्यासाठी
मशाल घेतली क्रांतीची ।।३।।

रायगड भूमीचा अभिमान
किर्ती तुमची महान ।।४।।

– मिनल शंकर माळी
चिर्ले, उरण





शिक्षण प्रसारक

आधुनिकतेचे शिक्षण प्रसारक
रामशेठ ठाकूर
विद्यार्थ्यांना ज्ञानाची देती समृद्धता ।।धृ।।

तुम्ही कैवारी गोरगरीबांचे
तुम्हा ध्यास सदा विकासाचे
रामशेठ ठाकूर नाव त्यांचे ।।१।।

समाजसेवेचे व्रत स्वीकारूनी
आभाळागत माया देवूनी
रयतेच्या मनी शोभती ।।२।।

ज्ञान प्रकाशाचा प्रसार करती
कला गुणांना ते घडवती
उंच भरारी घेण्यास शिकवती ।।३।।

– मनस्वी मिनल शंकर माळी
चिर्ले, उरण





अभिष्टचिंतन
कष्टकऱ्यांच्या रामाचे

पार दळदळीतील, खार बांधावरील गाव ।
कष्टकऱ्यांचे, गोरगरीबांचे गव्हाणी जीवन ।।
हलाखीची गर्द सावट, ना क्षण सुखाचे ठाव ।
तया जन्मले 'राम', पालटला नियतीचा डाव ।।

कमवून शिकले, शिकून -शिकवून टिकले ।
शांत, मृदु, सुस्वभावी, तुम्ही जन सारे जिंकले ।।
जिद्द केलीत शिक्षणाची, झुंज दिली गरिबीशी ।
दानशूर होऊनी, नाळ घट्ट समाज सेवेशी ।।

वाढता व्यवसाय, शैक्षणिक संस्थांची उभारी ।
सर्वसामान्यांचे खासदार, संसद रत्न भारी ।।
सामाजिक कार्य अफाट, दिव्य उत्तुंग भरारी ।
स्फूर्तीदायी तव जीवन, स्मरावे रामप्रहरी ।।

अमृतमहोत्सवी वर्षी, मी दिव्यकार्य वर्णितो ।
रामजी तुम्हां, शतदा: अभिष्टचिंतन करतो ।।



– ॲड. प्रमोद तुकाराम म्हात्रे
पनवेल

अमृतमहोत्सव अभिष्टचिंतन
सोहळ्याच्या निमित्ताने....



सामान्य माणसाने असामान्यत्वाच्या शिखरावर कसे पोहचावे याचे तेजस्वी उदाहरण म्हणजे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा प्रेरणादायी जीवनप्रवास होय. संघर्ष, कष्ट, प्रामाणिकपणा आणि समाजसेवेच्या बळावर एखादा व्यक्ती जनमानसाच्या हृदयावर अधिराज्य गाजवू शकतो हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले आहे

– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



अमृतमहोत्सव अभिष्टचिंतन
सोहळ्याच्या निमित्ताने....



आज सत्तेच्या खुर्चीला फारच चिकटून बसतात. नगरसेवकाला आमदार व्हायचे असते, आमदाराला मंत्री व्हायचे असते, मंत्र्यांना मुख्यमंत्री व्हायचे असते. असे अतृप्त असणे आजच्या राजकारणात पहायला मिळते, मात्र दोन वेळा खासदार होऊनही वयाच्या ५२ व्या वर्षी राजकारणातून निवृत्त होणारे रामशेठ ठाकूर यांचा आदर्श सर्वच राजकारण्यांनी घ्यावा

– नितीन गडकरी
केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री




षद नवीन पनवेल, पनवेल शाखा
ायोजित


















श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ
कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल, पनवेल शाखा
आयोजित
साहित्यिकांचा
गौरव सोहळा
आणि
मा.रामशेठ ठाकूर








कोकण मराठी साहित्य परिषद
नवीन पनवेल शाखा आयोजित




लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांच्य
कोकण मराठी साहित्य


कोकण मराठी साहित्य परिषद
कविसंमेलन




कोकण मराठी साहित्य परिषद
पोपटी
कविसंमेलन


कोकण मराठी साहित्य परिषद
कविसंमेलन



नवराष्ट्र

कार्यक्रम • महात्मा फुले महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त दा. कृ. सोमण यांचे प्रतिपादन

प्रादेशिक भाषा संवर्धन करण्याची गरज



'मराठी नावेच आतलंबाहेर चालू द्या'

'लिलगॉतील चलतचार पाहिले पाहिजेत'

पुढारी

महात्मा फुले महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात

सर्वांनी मराठी भाषेचे अस्तित्व जपा -लोककवी प्रशांत मोरे यांचे आवाहन



रायगड सम्राट कनेक्शन

महिलांच्या लिखाणात वास्तव आयुष्याचे दर्शन- कवी अरुण म्हात्रे

कोमसाप रायगडचा रुची सन्मान पुरस्कार सोहळा



पनवेल टाइम्स

कवी संमेलन म्हणजे उत्सवांचा महोत्सव

- मधु मंगेश कर्णिक



पुण्य नगरी

साहित्यिकांचा मी कृतार्थ आहे - रामशेठ ठाकूर



नवराष्ट्र

साहित्यिक लिहितात ते हृदयाला भिडते



चारोळी संग्रहाचे प्रकाशन



घरोघरी पुस्तकांची गुढी उभारा!

कोमसापच्या अध्यक्षा नमिता कीर यांचे आवाहन

प्रतिनिधी । आपलं महानगर वृत्तसेवा

पनवेल : आपण गुढ्या उभारतो ती आपली परंपरा आहे, परंतु खऱ्या अर्थाने पुस्तकांची गुढी प्रत्येकाच्या घरी उभारली गेली पाहिजे. पुस्तके वाचली पाहिजेत, मागसाचे आयुष्य म्हणजे पुस्तक असते, त्यांच्यासाठी तो लढा असतो, संघर्ष असतो. पुस्तकातून आपल्या आयुष्यातील अनेक प्रश्नांची उत्तरे मिळतात, असे प्रतिपादन कोमसापच्या अध्यक्षा नमिता कीर यांनी केले. आनंद वारी या कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

कोकण मराठी साहित्य परिषदेची नवीन पनवेल शाखा आणि बी.बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्याची आनंद वारी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गुढीपाडव्याचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी दिलेल्या पुस्तकांची झाकरूपी गुढीचे पूजन करण्यात आले. तसेच याप्रसंगी गृहउद्योजिका रोहिणी कुस्देकर, अंड. अपर्णा कुलकर्णी- नाडगौडा, कवियत्री जोशना राजपूत, शिवनेरी महिला बचत गट, तुळजाभवानी महिला बचत गट यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यानिमित्ताने कोकण मराठी साहित्य परिषदेची नवीन पनवेल शाखा आणि बी.



बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन, नवीन पनवेल यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

कोकण मराठी साहित्य परिषदेचे जनसंपर्कप्रमुख रायगडभूषण प्रा. एल.बी.पाटील यांनी कोणतीही बोली भाषा ही शुद्धच असते, असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी यांनी केले तर सूत्रसंचालक संस्कृती डुमरे यांनी केले. या कार्यक्रमासाठी अष्टदशे तांत्रिक समूहाचे अध्यक्ष धनराज विसपुते, रायगड जिल्हा कोकण मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष सुधीर शेठ आदी उपस्थित होते.

प्रा.चंद्रकांत मढवी यांचा कोमसापतर्फे सन्मान



पनवेल (वा.) कोकण मराठी साहित्य परिषदेच्या वाटचालीत योगदान दिल्याबद्दल कोकण मराठी साहित्य परिषदेच्या वार्षपन दिनानिमित्त कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे संस्थापक अध्यक्ष,ज्येष्ठ साहित्यिक प्रा.चंद्रकांत मढवी यांचा कर्मी केशवसुत स्मारक मालगुंड(रत्नगिरी) येथे कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सम्मेलनात अध्यक्ष नमिता कीर, कार्याध्यक्ष डॉ.प्रदीप ढवळ यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

रामशेठ ठाकूर यांनी केले अभिनंदन

हा सन्मान झाल्याबद्दल पनवेल येथे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्रा.चंद्रकांत मढवी यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी कोकण मराठी साहित्य परिषदेचे केंद्रीय जिल्हा प्रतिनिधी गणेश कोळी तसेच ऐड. मनोज म्हात्रे, कवी गणेश म्हात्रे, जेष्ठ पत्रकार संजय कदम, श्याम पुंडे, संजय पोडसे, भालचंद्र जुमलेदार, समीर पेंडसेकर आदी उपस्थित होते.

पनवेलमध्ये साहित्यिकांचा सत्कार आणि कवी संमेलन संपन्न

शब्दांची मैफिल मनाला नवीन ऊर्जा देते : रामशेठ ठाकूर





नवराष्ट्र

www.navarashtra.com

शाखेच्या सर्वसाधारण सभेत नूतन कार्यकारिणीची एकमताने निवड

कोमसाप अध्यक्षपदी गणेश कोळी

पनवेल, (प्र.प्र.) कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेच्या अध्यक्षपदी गणेश कोळी यांची निवड झाली आहे. शाखेच्या सर्वसाधारण सभेमध्ये नूतन कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली. त्यामध्ये उपाध्यक्ष विमल गांधी, सचिव गणेश म्हात्रे, सहसचिव सुनिता रामचंद्र, कोषाध्यक्ष प्रणाली म्हात्रे, जिल्हा प्रतिनिधी जोशना राजपूत, युवाशक्ती प्रमुख जयेश शिंदे, सदस्य ऋता भगरे, रामदास गायधने, अनिल दाभाडे, चित्रलेखा जाधव, संजय गुरव, श्याम पुंडे, गुणवंत पाटील, योगिनी वैद्य, विलास पुंडले, संजय पोडसे, अहिल्यानाथ गावडेकर, शुभांगी म्हात्रे, विजय पवार, रोहन गायंद, नियती पाटील तर सल्लागार प्रा. चंद्रकांत मढवी, अँड. मनोज म्हात्रे यांची निवड झाली. पनवेल तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे व त्यांच्या सहकाऱ्यांचेवरच सभाजातील सर्वसम्मतीतून कोमसाप नवीन पनवेल शाखेच्या अध्यक्ष गणेश कोळी आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन करण्यात येत आहे.



कोकण मराठी साहित्य परिषद

नवीन पनवेल शाखा



गणेश कोळी
अध्यक्ष



स्मिता गांधी
उपाध्यक्षा



गणेश म्हात्रे
सचिव



सुनिता रामचंद्र
सहसचिव



प्रणाली म्हात्रे
खजिनदार



जोत्स्ना राजपूत
जिल्हा प्रतिनिधी



जयेश शिंदे
युवा प्रतिनिधी



प्रा. चंद्रकांत मढवी
सल्लागार



ॲड. मनोज म्हात्रे
सल्लागार

: सदस्य :



ऋता भामरे



अनिल दाभाडे



चित्रलेखा जाधव



श्याम पुंडे



आदिनाथ गाडेकर



संजय गोडसे



योगिनी वैद्



नियती पाटील



शुभांगी म्हात्रे



ॲड. ज्योती सरोदे



रामदास गायधने



सुनिता चौधरी




शैलेश चौधरी


लोकनेते, माजी खासदार भा.रा
याच्या वाढदिवसानिमित्त







उत्स्फूर्तपणे अनेकांना श्री. रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त कवितेतून व्यक्त व्हावसं वाटणं ही मोठी गोष्ट आहे. राजकारणाच्या पल्याड खरे तर रामशेठ हे मूळचे शिक्षक आहेत. कविसंमेलनात ते रमतात. अनेकांच्या कविता वा ओळी त्यांना मुखोदगत असतात. राजकारणातून निवृत्ती घेतल्यानंतर ते आता खऱ्या अर्थाने सांस्कृतिक कार्यक्रमात रमतात. साहित्यिक कलावंतांना ते आपल्या जवळचे आहेत असे वाटणे मोलाची गोष्ट आहे. अतिशय साध्या आणि मृदू अशा रामशेठ ठाकूर यांना आम्हा सर्व कवींकडून हार्दिक शुभेच्छा! शतायुषी व्हा!

अशोक नायगावकर

सुप्रसिध्द कवी